म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं.

स्वराज्य [illegible]-पुस्तक-माला.

पुस्तक १ व २.

# स्वराज्याची पात्रता

व

# इंग्लडांतील स्वराज्याचा इतिहास.

REFBK-0019150

किंमत ०१ आणा.

होमरूल लीग ऑफीस,

४८६ नारायण पेठ, पुणें.

' होमरूल-लीग ' च्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां बेळगांव ता. २८ एप्रिल १९१६ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां ' होम-रूल-लीग' कमिटीची सभा भरली होती. सभेस पुढील गृहस्थ हजर होतेः—

(१) रा. ग. श्री. खापर्डे, (२) रा. बा. गं. टिळक, (३) जोसेफ बॅपटिस्टा, (४) डॉ. बा. सि. मुंजे, (५) रा. मा. श्री. (६) रा. र. पां. करंदीकर, (७) रा. ग. ब. फणसळकर (८) रा. बं. आळतेकर, (९) डॉ. चंदुलाल म. देसाई, (१०) रा. द. व्यं. देव (११) रा. न. चिं. केळकर.

रा. खापर्डे यांना सभेचे अध्यक्ष निवडल्यावर बरीच चर्चा होऊन मतें पुढील ठराव पसार करण्यांत आले.

(१) ' इंडियन होम-रूल-लीग ' ( हिन्दी-स्वराज्यसंघ ) या एक संघ स्थापन करण्यांत यावा.

(२) ब्रिटिश साम्राज्यांतर्गत ' होम-रूल ' अथवा ' स्वराज्य स्थानाकरितां सनदशीर मार्गानें मिळविणें व ' होम-रूल ' मिळविण्य राष्ट्रांत लोकमत शिक्षित व तयार करणें, हे या संघाचे उद्देश आहेत.

(३) संघाचे अधिकारी सध्या पुढीलप्रमाणें नेमण्यांत आले आहेत:

अध्यक्षः—बॅ. जोसेफ बॅपटिस्टा बी. ए. एल्.एल्. बी. एम. ई, बार-ऍट लॉ.

चिटणीसः—रा. न. चिं. केळकर बी. ए., एल्.एल्., बी.

मदत चिटणीसः—रा. दा. वि. गोखले बी. ए. एल्, एल्. बी.

(४) वयाचीं २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणाही पुरुषास अगर वरील उद्देश मान्य असल्यास व ते तसे मान्य आहेत अशाबद्दल केल्यास संघाचे सभासद होतां येते. संघाची प्रवेश फी कमीत कमी रु. १ आहे.

स्वराज्यसंघ—पुस्तकमाला.

पुस्तक १ लें.

# स्वराज्याची पात्रता.

( मॉडर्न रिव्हयूवरून )

**लेखकः—जयराम केशव असनारे, वकील, उमरावती.**

हिंदुस्थानाला एक दिवस असा येणार आहे कीं, त्याला ब्रिटिश अंमलाखालीं, किंवा ब्रिटिश अंमलाव्यतिरिक्त, स्वतःचा कारभार स्वतः चालवावा लागेल, ही गोष्ट आजपर्यंतचे सर्व ब्रिटिश मुत्सद्दी जाणून नव्हते असें नाहीं. कांहीं जणांनीं तर आपलें हें मत कागदावर नमूदही करून ठेवलें आहे. उदाहरणार्थ—मार्किस आफ हेस्तिंग्ज यांनीं आपल्या खाजगी रोजनिशींत १७ मे १८१८ रोजीं लिहिलें आहे कीं, " ज्या इंग्लंडकडे हिंदुस्थानची सर्व सत्ता, इच्छा नसतांनाही पण हळू हळू आली आहे, त्या इंग्लंडला असा एक दिवस—आणि तोही लवकरच—येणार आहे कीं त्याला, राजनीतीच्या उदात्त तत्वांसाठीं हिंदुस्थानावरील आपली सत्ता सोडण्याची इच्छा होईल. त्या वेळेस, आपल्या सत्तेखालीं कांहीं दिवसांकरतांच आलेल्या प्रजेला आम्ही सुशिक्षित केलें, तिला सन्मार्गांत एकटेंच चालण्यास समर्थ केलें, आणि त्याबद्दल ती प्रजा आपल्या उपकारकर्त्यांशीं कृतज्ञतेनें वागून, आम्हाला खरोखरच जें हितकर आहे तें व्यापारी दळणवळण आमच्याशीं ठेवीत आहे, याबद्दल इंग्लंडला अत्यंत अभिमान वाटूं लागेल." ( पाणिनी आफिस आवृत्ति पान २६१–२६२ )

आमचें ध्येय स्वराज्य आहे ही गोष्ट सर्वांनाच कबूल आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश अधिकारी देखील अलीकडे कबूल करतात कीं हिंदुस्थानचें

ध्येय स्वराज्यच आहे, आणि त्याकडेच त्यानें आपली प्रगती केली पाहिजे. कांग्रेस व मॉस्लेमलीग यांमध्यें ज्या विषयांची अनुकूल चर्चा होत आहे त्यांत स्वराज्य या विषयाचा प्रवेश झालाच आहे. होमरूललीगचा तर मुख्य हेतुच स्वराज्य आहे. आणि अलीकडे कांहीं महिन्यांपासून तर सर्व वर्तमान-पत्रांतून याच विषयाची चर्चा होत आहे. याप्रमाणें स्वराज्य हेंच आपलें ध्येय व साध्य आहे याबद्दल मतभेद नाहीं. मतभेद फक्त तें ध्येय प्राप्त होण्याकरितां किती काळ लागेल, याबद्दलच आहे. लॉर्ड मोर्ले यांच्यासारख्या स्वतंत्र–सुधारणा–वादी मुत्सद्यांना, हिंदुस्थान एकतंत्री सत्तेमधून केव्हां मुक्त होईल याचा अंदाजच होत नाहीं. त्यांच्यापेक्षां किंचित जास्त कल्पक असे मुत्सद्दी, ही गोष्ट वऱ्याच कालावधीची आहे, असें म्हणतात. कांहीं असें म्हणतात कीं, ही गोष्ट कालावधीची जरी असली तरी ती सिद्ध होण्यास इतका जास्त काळ लागणार नाहीं. कांहीं म्हणतात कीं राज्यकारभारावर दाब ठेवतां येईल असे कांहीं अधिकार तर हिंदुस्थानच्या लोकांना आतांच दिले पाहिजेत. आणि दुसरे कांहीं असें म्हणतात कीं, स्वराज्याची पूर्ण योजना आतांच तयार करावी, व त्याप्रमाणें लोकांच्या प्रतिनिधींना हक्क देण्याचा आतांच उपक्रम करून १० किंवा जास्तींत जास्त २० वर्षांत लष्करी व बिन लष्करी अशा दोन्हीं खात्यांत त्यांना पूर्ण सत्ता देण्यांत यावी; म्हणजे मग तेवढ्या अवकाशांत हिंदुस्थानचा राज्यकारभार पूर्णपणें राष्ट्रीय होईल. अशीं भिन्न मतें आहेत म्हणून, स्वराज्याची पात्रता म्हणजे काय, हें समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उपयोगी होईल असें वाटतें.

## ‘स्वराज्यां’त कोणत्या गोष्टींचा समावेश होतो ?

आपला कारभार आपणच चालविणारें राष्ट्र काय करतें, व त्यानें काय केलें पाहिजे ? अथवा अन्य रीतीनें म्हणावयाचें म्हणजे देशाचा कारभार चालविणें म्हणजे काय ? परचक्रापासून देशाचें रक्षण करणें, बंडें, क्रांत्या, चोऱ्या वगैरे बंद करून देशांत शांतता व व्यवस्था ठेवणें, निरनिराळ्या प्रकारचे कर बसवून जरूर असेल तितका पैसा वसूल करणें, व त्याचा विनियोग काट-कसरीनें व लोकांना हितकारक असा करणें, कायदे करणें व त्यांची अंमल-

मं. १९१२०



वजावणी करणें, शिक्षण, आरोग्य यांची व्यवस्था करणें, देशांतल्या देशांत जलमार्गानें, स्थलमार्गानें, अथवा रेल्वेमार्गानें प्रवास व व्यापार यांच्या सोई करून दळणवळण वाढविणें, शेतकी, व्यापार, व कलाकौशल्य यांची वाढ करण्याकरितां लोकांना उत्तेजन व मदत देऊन देश सधन करणें, इतर देशांशीं दळणवळण व व्यापार करण्याकरितां जलमार्गाची वृद्धि व विस्तार वाढवणें, विद्या व कला यांची वृद्धि होण्यास मदत करणें इत्यादि गोष्टी करणें हें सरकारचें मुख्य कर्तव्य आहे.

## स्वदेशी सरकार व परदेशी सरकार.

वर दिलेलीं कर्तव्यें परदेशीय सरकारांकडून समाधानपूर्वक केलीं जाणें कधींही शक्य नाहीं. सरकार जर स्वदेशीय असेल तरच हीं कर्तव्यें समाधानपूर्वक केलीं जातील. परदेशीय सरकारांच्या राज्यपद्धतीमध्यें जे परदेशीय लोक असतात त्यांना आपला स्वतःचा देश, व ज्यांवर कारभार चालवावयाचा असतो तो देश, या दोन्ही देशांकडेस लक्ष द्यावें लागतें; व त्यामुळें सत्तेखालीं असलेल्या देशांच्या कल्याणाकडे त्यांचें सर्व लक्ष असणें शक्य नसतें. आणि जेव्हां दोन देशांच्या हिताहितामध्यें विरोध पडतो तेव्हां सत्तेखालच्या देशांपेक्षां स्वतःच्या देशाच्या हिताकडे त्यांचें मन अगदीं साहजिकपणें वळतें.

## ब्रिटिश सरकारनें काय केलें व काय केलें नाहीं ?

गेल्या दीड शतकापासून सरकारनें करावयाचीं बहुतेक सर्व कर्तव्यें ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांत करीत आलें आहे. त्यांपैकीं, कांहीं कर्तव्यें करण्यामध्यें त्यांचा पूर्ण उत्साह दिसून येतो, कांहींत उत्साह कमी दिसून येतो, कांहींत उदासीनता दिसून येते आणि कांहीं कर्तव्यांला तर मुळीं हातच घातला गेलेला नाहीं. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत आरमार नाहीं, व व्यापारी किंवा लढाऊ जहाजें बांधण्याला सरकारनें मदतहि केली नाहीं व उत्तेजनहि दिलें नाहीं. उलट या देशांत पूर्वीं असलेली दर्यावर्दी कला व जहाजें बांधण्याची कला, या ब्रिटिश अमदानींतच ऱ्हास पावत जाऊन बहुतेक लयाला गेल्या आहेत. हिंदुस्थानच्या फौजेंतील सर्व खातीं (तोफ-

खाना, घोडेस्वार व पायदळ ) एतद्देशीयांच्या स्वाधीन नाहींत. खुद्द हिंदुस्थानचीं अशीं आकाशयानें नाहींत; आणि महत्त्वाच्या अधिकारावर सर्व परदेशीयच आहेत.

## आमची पात्रता.

सरकारनें करावयाचीं जीं कर्तव्यें हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकार करीत आहे, तीं बहुतेक सर्व एतद्देशीयांच्याच मदतीनें करीत आहे. ब्रिटिशांच्या पूर्वीच्याच अमदानींत तीं सर्व कर्तव्यें हिंदु व मुसलमान या दोघांनीं केलीं आहेत; आणि त्याच्याहि पूर्वीच्या अमदानींत हिंदु व बौद्ध यांनीं केलीं आहेत. ब्रिटिश अमदानीपूर्वीं देशाचा राज्यकारभार करणारे जरी हिंदु, मुसलमान, व बौद्ध होते तरी ते एतद्देशीयच-हिंदीच-होते. ब्रिटिश लोक आले ते कांहीं रानटी लोकांच्या देशांत आले नाहींत; तर ज्या देशांत राज्यकारभाराची कला बरीच सुधारलेली होती, अशा देशांत आले. ब्रिटिश अमदानींत देखील एतद्देशीय लोकांना लष्करी, बिनलष्करी अशीं जीं जीं कामें करण्याची सवलत मिळाली, त्या त्या कामांत त्यांनीं आपली योग्यताच दाखविली आहे. तेव्हां लष्करी किंवा बिनलष्करी कामें करावयाला आम्ही पूर्ण नालायक आहोंत असें म्हणतां येत नाहीं.

कदाचित् असा कोणी आक्षेप घेईल कीं ज्या कामांत एतद्देशीयांनीं आपली पात्रता दाखविली आहे, तीं कामें हुकमतीखालचीं होतीं. ही गोष्ट बऱ्याच अंशीं खरी आहे. पण पूर्ण मुखत्यारीचींही जीं कामें एतद्देशीयांना दिलीं त्यांतहि त्यांनीं आपली पात्रताच दाखविली. शिवाय, बहुतेक खात्यांतील पूर्ण मुखत्यारीचीं अशीं कामेंच जर त्यांना दिलीं गेलीं नाहींत, व त्यांना जर आपली कल्पकता व पात्रता दाखविण्याची संधीच मिळाली नाहीं, तर अशी संधी न दिल्याकारणानेंच त्यांची या कामाबद्दलची लायकी किंवा नालायकी दिसून आली नाहीं, एवढेंच मात्र म्हणणें केवळ तर्कदृष्ट्या सयुक्तिक होईल. पण हें अनुमान ब्रिटिश अमदानीपुरतेंच आहे, ही गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे. ब्रिटिश अमदानीपूर्वीं अशा तऱ्हेचीं सर्व कामें करण्याला हिंदी लोक लायक होते, व त्यांनीं तीं केलींहि आहेत.

पण, त्यानंतर या कलेचा ऱ्हास होत गेला, असें जर म्हणाल तर त्याचा दोष हिंदी लोकांच्याच माथीं मारणें न्याय्य होणार नाहीं.

## " पात्रता सिद्ध करा, मग पाहूं. "

सरकार म्हणेल कीं " तुम्ही आपली पात्रता सिद्ध केली असती, तर आम्ही तुम्हाला मोठमोठ्या जागा दिल्या असत्या." पण हें म्हणणें लंपडावीचें आहे. कोणत्याहि कामाची पात्रता, तें काम करण्याची संधी मिळाल्याशिवाय कशी सिद्ध होणार ? " प्रथम तुम्हाला पोहतां येतें हें सिद्ध करा, नंतर पाण्यांत उतरा, " असें म्हणण्याप्रमाणेंच हें म्हणणें हास्यास्पद आहे. शिवाय एतद्देशीयांना त्यांच्या लायकीप्रमाणेंच जागा दिल्या जातात, हेंहि म्हणणें खरें नाहीं. शिक्षणखात्याचीच गोष्ट पहाना! या खात्यांत, अनुभविक व कसलेल्या हिंदी पदवीधरांना वगळून त्यांच्या जागीं इंग्रज किंवा वसाहत-वाल्या कच्च्या पदवीधरांची नेमणूक करण्याचा नियमच होऊन बसलेला आहे.

अंमलबजावणी व राज्यव्यवस्था या खात्यांत देखील असेंच दिसून येतें. रमेशचंद्र दत्त, कृष्ण गोविंद गुप्त यांच्या सारख्यांना लेफ्टेनेंट गव्हर्नरची तर नाहींच, पण चीफ कमिशनरची देखील जागा मिळूं शिकली नाहीं! या जागांवर सामान्यतः नेमण्यांत आलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांपेक्षां हे लोक योग्यतेनें कमी होते असें म्हणतां येत नाहीं. पुष्कळ डेप्युटीकलेक्टर असे आहेत कीं ते डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला काम कसें करावें हें शिकवूं शकतील. पण ते नेहमीं हाताखालच्या जागांवर असलेलेच आढळून येतात. लष्करांतहि व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणाऱ्या हिंदी मनुष्याला देखील लेफ्टेनेंटची जागा मिळण्याची आशाच नाहीं!

आमची पात्रता कबूल करणें स्वाभाविकपणें इंग्रज लोकांच्या जिवावर येते, ही गोष्ट तर निःसंशय आहे. आमची पात्रता जर त्यांनीं कबूल केली तर मग दोनच मार्ग आहेत. एक ज्या जागांबद्दल आमची पात्रता कबूल असेल, त्या जागा त्यांनीं आम्हांला द्याव्या. पण तसें केलें तर भरभक्कम प्राप्तीच्या जागांवरून त्यांची हकालपट्टी होईल! नाहींतर त्यांनीं

असें स्पष्ट म्हणावें कीं, " जरी तुम्ही लायक असला तरी आमच्या हातांत राजकीय सत्ता आहे म्हणून, तुमच्या योग्यतेच्या जागा आम्हीं तुम्हांला साफ देत नाहीं. " पण हिंदुस्थानचे सत्ताधिकारी असें नीचपणाचें भाषण कधींहि करणार नाहींत.

## हिन्दी लोकांची कर्तृत्वशक्ति.

देशाचा राज्यकारभार यशस्वी रीतीनें चालविणें, ही गोष्ट हिन्दी लोकांच्या शक्तीच्या आटोक्यांत न येण्याइतकी घोटाळ्याची व गूढ नाहीं. बुद्धिमत्ता, कल्पकता व कर्तृत्वशक्ति यांचे प्रकार जरी निरनिराळे दिसून येतात, तरी वस्तुतः ते तसे नसून त्यांचा परस्परांशीं संबंध आहेच. एखाद्या गोष्टींत जर एखाद्या राष्ट्राची बुद्धिमत्ता, कल्पकता, व कर्तृत्वशक्ति दिसून आली तर इतर गोष्टींतहि ती दिसून येईल असें मानणें गैरवाजवी होणार नाहीं. मात्र त्याला तशी संधी मिळाली पाहिजे. प्राचीन काळच्या गोष्टी राहोत; पण अवनतीच्या म्हणून मानल्या जाणाऱ्या हल्लींच्या काळांत देखील अध्यात्माचा विचार करणारे व जगताला तें ज्ञान शिकविणारे जे कांहीं श्रेष्ठ पुरुष आहेत, त्यांत हिन्दी लोकांचा समावेश होत आहे. जगतांतील श्रेष्ठ शिल्पशास्त्रज्ञ, जगतांतील श्रेष्ठ रसायनशास्त्रज्ञ, जगतांतील श्रेष्ठ मुत्सद्दी, व जगतांतील श्रेष्ठ हिंमती व धंदेवाले, या सर्वांमध्यें हिन्दी लोकांचें नांव आहेच. परकी सत्तेमुळें आलेल्या सध्यांच्या हीन स्थितीमध्यें देखील, एतद्देशीयानें ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आपला शिरकाव करून घेतला. लंडन, दिल्ली व सिमला येथील हिंदुस्थानच्या कौंसिलांतहि जागा मिळविली, आणि रणांगणांत अद्वितीय शौर्य दाखवून व्हिक्टोरिया क्रासहि मिळविला. " अशा व्यक्ति थोड्या असल्यामुळें त्या अपवादात्मकच होत, " असें म्हणून चालणार नाहीं. सर्वांत मोठीं झाडें वृक्षरहित अरण्यांत सांपडत नाहींत; तर ज्या जंगलांत जवळजवळ त्यांच्या तोडीचींच अशीं झाडें असतात, त्याच जंगलांत तीं सांपडतात. कोणत्याहि देशाचा कोणत्याहि वेळचा इतिहास पाहिला तरी असेंच आढळून येतें कीं त्या वेळीं जो सर्वांत मोठा कवी, सर्वांत मोठा शास्त्रज्ञ, सर्वांत मोठा मुत्सद्दी किंवा सर्वांत

मोठा सेनाकुशल म्हणून नांवाजला गेला, तो कांहीं आपापल्या खात्यांत एकटाच नव्हता. तर त्या वेळेस त्याच्या खालोखाल असे कवी, शास्त्रज्ञ, मुत्सद्दी, सेनाकुशल, इतर होतेच. शेक्स्पियर, डार्विन, ग्लॅडस्टन, वेलिंग्टन, नेल्सन, हीं कांहीं निसर्गदेवतेची अद्वितीय रत्नें नव्हत. तर जवळ जवळ त्यांच्या तोडीचींच अशीं रत्नें त्या वेळेस पुष्कळ होतीं. ही गोष्ट जशी इंग्लंडसंबंधानें खरी आहे तशीच ती इतर देश व हिंदुस्थान यांच्या संबंधानें देखील खरी आहे. आमच्यांत देखील जगतांतील प्रसिद्ध लोकांप्रमाणेंच नैसर्गिक देणगी असणारे लोक आहेत. कांहीं त्यांच्या तोडीचे आहेत, आणि कांहीं तर त्यांच्यापेक्षांहि कांकणभर जास्तहि असूं शकतील. त्यांना संधी जर मिळाली, तर मानवी जीवनक्रमांतील कोणत्याहि बाबतींत त्यांची श्रेष्ठ प्रकारची पात्रता स्पष्टपणें निदर्शनास येईल.

## संधी मिळणें व संधी मिळविणें.

आम्ही वर संधी संधी म्हणून बरेच वेळ म्हटलें आहे. यावर कोणी असें म्हणेल कीं "व्यक्तीप्रमाणें राष्ट्र देखील संधी स्वतः आणून घेत असतें, दुसरा कोणी त्याला संधी देत नसतो." हें म्हणणें केवळ अंशतःच खरें आहे. अमेरिकेंतील निग्रो लोकांना संधी मिळाली म्हणून ते आतां आपली योग्यता दाखवीत आहेत. त्यांच्या स्वतःच्या देशांत त्यांना कधींहि संधी मिळाली नाहीं. पण त्यांच्या संबंधानेंहि असेंच विचारण्यांत येतें कीं "त्यांनीं आपल्या देशांत तशी संधी आणून कां घेतली नाहीं? गोऱ्या अमेरिकनांचे पूर्वज गोरे युरोपिअन हे निग्रोपेक्षां पुष्कळ अगोदर सुधारलेले होते; यावरून निग्रोपेक्षां गोरे लोक श्रेष्ठ आहेत ही गोष्ट उघड दिसून येत आहे. गोऱ्या लोकांनीं संधी मिळविली व निग्रो लोकांना संधी द्यावी लागली." असेंच कदाचित् आम्हालाहि विचारण्यांत येईल कीं "तुम्ही देखील संधी मिळवा, संधी द्या असें कां म्हणतां? स्वतः संधी आणून घ्या, आणि या कार्यांत तुम्हाला व्यत्यय आले तर ते दूर करा." ठीक आहे; आम्ही तर तसें करूंच, आणि भवितव्यता बदलणें जेथवर मनुष्याच्या हातीं आहे तेथवर ती बदलूंच. पण स्वतःला श्रेष्ठ म्हणविणाऱ्या या लोकांना

आम्ही एका गोष्टीची आठवण देतों, ती ही कीं, मानवी इतिहास हा कांहीं ज्या थोड्याशा शतकांपासून युरोपचें वैभव वाढलें आहे, तेथपासूनच आहे असें नाहीं. सर्व, निदान बहुतेक, युरोपिअन लोकांच्या पूर्वी हिंदु, इजिप्शियन व चिनी लोक सुधारलेले होते. त्यांना तशी संधी मिळाली होती आणि त्यांनीं ती आणूनहि घेतली होती. त्या वेळेस इजिप्शियन लोकांनीं जशी स्वतःला सुधारण्याचीं संधी आणून घेतली तशी युरोपिअन लोकांनीं कां आणून घेतली नाहीं ? आणि तसें त्यांनीं केलें नाहीं म्हणून त्यांचा दर्जा कमी आहे असें म्हणतां येईल कां ? जपानच्या लोकांना तर गेल्या अर्ध्या शतकांतच तशी संधी मिळाली व ती त्यांनीं आणूनहि घेतली. अशा तऱ्हेचा चक्रनेमिक्रम प्रत्येक देशाच्या इतिहासांत दिसून येतो. अशी कोणींहि घमेंड मिरवूं नये कीं आमच्या भवितव्यतेची सर्व सूत्रें आमच्याच हातांत आहेत. आणि असाहि नेभळेपणाचा विचार कोणीं मनांत आणूं नये कीं आमची वर्तमानकाळची व भविष्यकाळची स्थिति बदलण्याला आम्ही अगदीं असमर्थ आहों. तेव्हां ज्यांच्या हातांत सामर्थ्य आहे त्यांनीं, ज्यांना संधीची जरूर असेल त्यांना ती द्यावी. कारण न जाणो कदाचित् आज जे संधी देणारे आहेत त्यांना स्वतः संधी मागण्याचीहि पाळी येईल. तसेंच जे संधी मागणारे आहेत त्यांनीं देखील जेथवर त्यांच्या हातांत आहे तेथवर—आणि तें बऱ्याच अंशीं त्यांच्या हातांत आहे—तशी संधी आणून घ्यावी. भवितव्यतेची मर्यादा कांहीं ठरीव नाहीं. तर प्रत्येक राष्ट्राला आपल्या सामर्थ्यानें व चिकाटीनें वरचेवर पुढें पुढें ढकलतां (रेटतां) येतें. कारण ती मर्यादा तशीच लवचीक आहे.

## भूतभविष्यकालीन राज्यपद्धति.

कांहीं लोकांची अशी कल्पना दिसते कीं कोणत्याहि देशांत भूतकाळीं जी राज्यपद्धति प्रचलित असेल तिच्याहून निराळी राज्यपद्धति त्या देशांत वर्तमानकाळीं किंवा भविष्यकाळीं अंमलांत येऊं शकत नाहीं. या मताला किंवा कल्पनेला इतिहासाचा मुळींच आधार नाहीं. कारण आज ज्या देशांत

राजप्रजासत्ताक[1], किंवा प्रजासत्ताक[1] राज्यपद्धति चालू आहे, त्या देशांत पूर्वी एका काळीं अनियंत्रित राजसत्ताक[1] पद्धति चालू होती असें इतिहास सांगत आहे. तथापि प्रातिनिधिक पद्धतीला एखादा देश लायक आहे कीं नाहीं हें ठरविण्याला त्या देशांत पूर्वी कोणती पद्धति प्रचलित होती हें पाहणें जरूर आहे असें जरी गृहीत धरलें तरी हिंदुस्थान या हक्काला अगदीं नालायक आहे असें म्हणतां येत नाहीं.

## हिंदुस्थानांतील प्रजासत्ताकपद्धति.

युरोपिअनांना माहीत असलेली सर्वांत जुनी प्रजासत्ताक पद्धति म्हणजे जुना ग्रीस व रोम यांत असलेली होय. हिंदुस्थानांतहि प्रजासत्ताक पद्धति होती. तिचा विस्तार ग्रीस व रोम या दोहोंच्या मिळून होणाऱ्या विस्तारापेक्षां जास्त होता, व ती युरोपांतील प्रजासत्ताक पद्धतीपेक्षां जास्त दिवस टिकली. प्रो. ऱ्हीस डेविड यांचा ' बुद्धकालीन हिंदुस्थान ' व मि. व्हिन्सेंट ए. स्मिथ यांचा ' हिंदुस्थानचा पूर्वीचा इतिहास ' हे ग्रंथ वाचणाऱ्या कालेजांतील विद्यार्थ्यांना ही गोष्ट माहीत आहे. जर्नल आफ दि बिहार अँड ओरिसा रिसर्च सोसायटी नांवाच्या मासिकाच्या दुसऱ्या अंकांत मि. के. पी. जसवाल यांनीं महाभारतांतहि प्रजासत्ताक पद्धति आहे असें लिहिलें आहे. हिंदुस्थानांतील जुन्या राजसत्ताकपद्धतीच्या वेळीं देखील, ज्याला युरोपिअन लोक सनदशीर

---

१ **राजसत्ताक राज्यपद्धति**—जेथें केवळ एकट्या राजाच्याच तंत्रानें राज्यकारभार चालतो ती.

१ **राजप्रजासत्ताक राज्यपद्धति**–जेथें राजा व प्रजा किंवा प्रजेनें निवडलेले प्रतिनिधि यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालतो ती. या पद्धतींत राजाची सत्ता नियमांनीं बद्ध केलेली असते म्हणून इला सदनशीर राजपद्धति असेंहि म्हणतात.

१ **प्रजासत्ताक राज्यपद्धति**—जेथें लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींच्याच द्वारें कारभार चालतो, राजा म्हणून कोणी नसतो, ती.

दुसऱ्या व तिसऱ्या पद्धतींत लोकांच्या प्रतिनिधींचें अंग राज्यकारभारांत असतें म्हणून प्रातिनिधिक पद्धतींत या दोहोंचा समवेश होतो.

म्हणतात अशी जरी नाहीं तरी राजाच्या सत्तेवर चांगला वचक बसेल अशी व्यवस्था होती. प्रो. ऱ्हीस डेविड म्हणतात कीं संस्कृतमधील राजा या शब्दाचा ग्रीकमधील [1]Archaon किंवा रोममधील [2]Consul याच्या अर्थाप्रमाणें बोध होत होता. " हिंदुराज्याभिषेकपद्धतीचें सनदशीर स्वरूप" या विषयावर मि. के. पी. जसवाल यांनीं मॉडर्न रिव्ह्यूच्या १९१२ च्या जानेवारीच्या अंकांत जो लेख लिहिला आहे त्यांत त्यांनीं असें दाखविलें आहे कीं, पूर्वीं हिंदुराजांची नेमणूक निवडणुकीनें होत असे. निदान गादीवर बसण्याकरितां त्यांना लोकांची संमती लागत असे. या गोष्टीला रामायण व महाभारत यांतूनहि आधार मिळतात. आपल्या मागें गादीवर कोणीं बसावें याबद्दलचें लोकांचें मत समजून घेण्याकरितां दशरथानें काय केलें आणि लोकप्रिय रामचंद्राला वनवास झाल्यामुळें लोकांचा असंतोष कशा रीतीनें बाहेर पडला हें रामायणावरून आपणाला कळून येतें. महाभारतांत देखील, आंधळ्या धृतराष्ट्रानें योग्य वारस जे पांडव त्यांना गादीवर न बसवितां आपलाच पुत्र दुर्योधन याला जेव्हां गादीवर बसविलें तेव्हां काय झालें हें सर्वांना माहित आहे. बंगालमधील पालराजवंशाच्या इतिहासांत तर, एका राज्यक्रांतीनंतर लोक आपल्या मतांनींच राजा निवडूं लागले असें सांगितलें आहे. डॉ. सुधींद्रबोस व मि. आर. जी. प्रधान यांनीं[5] जे लेख लिहिले आहेत, त्यावरून हिंदुस्थानांत पूर्वीं राजाच्या एकतंत्री सत्तेवर कसा वचक असे याचीहि माहिती मिळते. दक्षिण हिंदुस्थानांत लोक,

---

१ Archaon पूर्वीं अथेन्स ( ग्रीसची राजधानी ) मध्यें दिवाणी व धार्मिक बाबतींत देखरेख ठेवण्याकरतां एक मुख्य अधिकारी नेमीत; त्याला आर्केऑन म्हणत.

२ Consul रोममध्यें पूर्वकाळीं दरवर्षी २ अधिकारी निवडीत व त्यांना सर्व कायदेशीर अधिकार दिलेले असत. त्यांना कॉनसल म्हणत.

३ Hindu Concept of Government या विषयावर.

४ The notion of Kingship in शुक्रनीति, या विषयावर.

५ फेब्रुवारी १९१६ च्या अंकांत.

संग्रहि २२०



उपाध्याय, ज्योतिषी, वैद्य, व मुत्सद्दी यांच्या ५ मंडळ्या तामील राजांच्या एकतंत्री सत्तेवर दाब ठेवण्याकरितां असत. हिंदुस्थानांतील गांवपंचायती तर लहानशा प्रजासत्ताक संस्थाच होत्या, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. यांचा प्रसार दक्षिण हिंदुस्थान व उत्तर हिंदुस्थान अशा दोन्ही ठिकाणीं झालेला होता. दक्षिण हिंदुस्थानसंबंधानें मि. व्हिन्सेंट स्मिथ म्हणतात—

" ग्रामसंस्थांचा अभ्यास करणाऱ्याला परंतकाचे लांब शिलालेख फार उपयोगी व हिताचे आहेत. त्यांमध्यें गांवच्या लोकांनीं निवडलेल्या पंचायती, राजाच्या मंजुरीनें, गांवाचा न्याय व व्यवस्था हे कारभार किती उत्तम रीतीनें करीत असत याची सविस्तर माहिती आहे. अशा तऱ्हेची खरोखर लोकप्रिय झालेली स्थानिक स्वराज्याची पद्धति पुष्कळ वर्षांपूर्वी नष्ट व्हावी ही फार दुःखाची गोष्ट आहे. आतांच्या सरकारनें त्याच प्रकारची कार्यकारी अशी स्थानिक पद्धति जर काढली तर ते त्यांना जास्त सुखकर होईल. ( हिंदुस्थानचा पूर्वेतिहास आवृत्ति २८ पान ४१ ).

## हिंदी राजनीति.

हिंदुस्थानांत पूर्वी साम्राज्याची व स्थानिक स्वराज्याची कला किती कार्यकरी झाली होती हें चाणक्याचें अर्थशास्त्र, शुक्रनीति, रामायण, महाभारत--विशेषतः शांतिपर्व, मनुसंहिता व इतर संहिता, सर शंकर नायर यांनीं वर्णन केलेले अनेक शिलालेख, चंद्रगुप्ताच्या राज्यकारभाराची ग्रीक लोकांनीं दिलेली हकीकत आणि सम्राट् अशोक, समुद्रगुप्त, धर्मपाद इत्यादिकांचीं महत्कृत्यें यांवरून स्पष्ट दिसून येतें. मुसलमान व मराठे यांच्या वेळीं, शेरशहा, अकबर, औरंगजेब, शिवाजी यांच्यासारखे मोठमोठे मुत्सद्दी व कारभारी झाले. पेशव्यांची मुत्सद्देगिरी व राजकारणपटुत्व हीं आज माहीत आहेत त्यापेक्षांहि जास्त शिकण्यालायक आहेत. अबुलफजल याच्या ऐनीअकबरीवरून अकबरच्या वेळच्या राज्यकारभाराच्या पद्धतीची उत्तम कल्पना होते. त्याचा कारभारी तोडरमल यानें घालून दिलेलीच जमाबंदीची पद्धत ब्रिटिश सरकारनें उचलली आहे. मुसलमानी धर्म लोकसत्तात्मकच आहे व मुसलमानी परंपराहि प्रातिनिधिक तत्त्व मान्य करीत आली आहे.

पंजाबमध्यें रणजीतसिंगची एकतंत्री सत्ता चालू होण्यापूर्वी शीख संस्थानें आपआपले कारभार लोकसत्तात्मक पद्धतीनेंच चालवीत असत. ब्रिटिशांच्या अमलापूर्वीचीं जीं कांहीं निरनिराळ्या प्रकारचीं स्मारकें आतां उरलेलीं आहेत तींवरून म्हणजे जुने खुष्कीचे रस्ते, जलमार्ग, पाटबंधारे इत्यादि सर्व गोष्टींवरून, त्या वेळेचे राज्यकर्ते व लोक आपला कारभार स्वतः चालविण्याला कसे समर्थ होते व त्यांची त्या वेळेस किती सुधारणा झाली होती, या गोष्टीची उत्कृष्ट साक्ष पटते.

तेव्हां आमच्या पूर्वेतिहासावरून आम्हीं स्वराज्याला मुळीं अपात्र ठरत नाहीं.

## जिंकलों गेलों म्हणून नालायक ?

सामान्यतः सर्वच इंग्रज लोक व कांहीं हिंदी लोक देखील असें समजतात कीं, ब्रिटिशांनीं हिंदुस्थान जिंकलें या गोष्टीवरूनच हिंदुस्थान स्वराज्याला नालायक आहे हें सिद्ध होतें. ते असें म्हणतात कीं, " जर हिंदुस्थानचे लोक आपला कारभार स्वतः चालविण्याला लायक असते तर ते जिंकलेच कसे गेले असते ? " तेव्हां या स्वातंत्र्यनाशावरून " हिंदुस्थानचें स्वराज्य नष्ट होणें हेंच योग्य आहे. " या गोष्टींचा विचार करण्याकरितां आज ताब्यांत असलेला सर्व हिंदुस्थान किंवा त्यांतील कोणताहि मोठा भाग ब्रिटिशांनीं खरोखरच जिंकला आहे काय ? या गोष्टीचा इतिहासदृष्टीनें विचार करण्याचें तूर्त कारण नाहीं. क्षणभर आपण हें गृहीत धरून चालूं कीं आम्हीं जिंकले गेलों आहों. पण ' त्यामुळें आम्हीं स्वराज्याला अपात्र आहों ' हा सिद्धांत इतिहासदृष्टीनें खरा ठरतो काय हें पाहूं.

---

१ इंग्लिशांनीं हिंदुस्थान कसें जिंकलें याचें ऐतिहासिकदृष्टीनें विवेचन प्रो. सीली (Expansion of England) यांच्या पुस्तकांत मनन करण्यासारखें केलें आहे. त्याचें मराठीं भाषांतर ' इंग्लंडचा विस्तार ' हें जप्त झालें असून सरकारजमा झालें आहे, पण इंग्रजी पुस्तक सरकारजमा नाहीं, म्हणून इंग्रजी जाणणाऱ्यांनीं तें पुस्तक अवश्य वाचावें व त्यांतील तत्वें मराठ्यांचे वेळेस कशी कार्यकारी झालीं हें पाहण्याकरितां कै. म. गो. रानडे यांचें Rise of the Maratha power हेंहि पुस्तक वाचावें.

## ब्रिटिश साम्राज्यांतील उदाहरणें.

फ्रेंच कॅनेडियन लोकांना इंग्रजांनीं १७६३ मध्यें जिंकलें. पण ती सर्व वसाहत १७९१ मध्येंच स्वतःचा कारभार स्वतःच चालवूं लागली. त्यानंतर त्यांनीं अनेक वेळां बंडें केलीं व प्रत्येक वेळेस त्यांचा मोड होत गेला आणि ते जिंकले गेले. तथापि ते अद्यापिहि स्वतःचा कारभार स्वतःच चालवीत आहेत. सुमारें १५ वर्षांपूर्वी दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोकांना ते जिंकले गेल्यानंतर लगेच स्वराज्याचे हक्क देण्यांत आले. आयर्लंड कित्येक शतकांपूर्वीं जिंकलें गेलें आहे. पण १८०१ मध्यें ग्रेटब्रिटनमध्यें सामील होण्यापूर्वीं त्याला स्वतःचें पार्लमेंट होतें; आणि ग्रेटब्रिटनमध्यें सामील झाल्यापासून तर ते लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां जास्त प्रतिनिधि ब्रिटिश पार्लमेंटमध्यें पाठवीत आहेत. त्यांनींहि बंडें केलीं, बंडाचे प्रयत्न केले, व वरचेवर अराजक उपायहि योजले, आणि प्रत्येक वेळेस त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले. पण त्यांचा प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क काढून घेण्यांत आला नाहीं. आणि आतां तर त्यांना होमरूल—स्वराज्य—च मिळणार आहे. वेल्स देखील जित राष्ट्रच आहे. पण त्यालाहि स्थानिक स्वराज्याचे हक्क आणि पार्लमेंटमध्यें आपले प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार आहे. खुद्द इंग्लंड सुद्धां, रोमन, अँगल, सॅक्सन, डेन्स व नार्मन, यांनीं जिंकलें होतें. पण त्याच इंग्लंडची आज जगतांतील अत्यंत स्वतंत्र राष्ट्रांत गणना होत आहे. तात्पर्य हें कीं आज जो जो देश स्वतंत्र व स्वावलंबी म्हणून समजला जात आहे तो प्रत्येक देश पूर्वीं एका काळीं केव्हां ना केव्हां तरी जिंकला गेला आहे, असें इतिहास सांगतो. न्यूझीलंडमधील ब्रिटिश वसाहतीला स्वतंत्र पार्लमेंट आहे. त्यांतले मूळचे रहिवासी मावरी लोक संख्येनें ५०००० ( पन्नास हजार ) च आहेत. पण त्यांना न्यूझीलंड पार्लमेंटमध्यें ४ प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार आहे. हा अधिकार त्यांना १८७१ मध्यें, म्हणजे गोऱ्या वसाहतवाल्यांनीं त्यांना जिंकल्यानंतर तावडतोबच देण्यांत आला. एन्सायक्लोपीडियांत असें लिहिलें आहे कीं, " हे लोक निशाणबाजींत अगदीं कच्चे होते, व छापा घालण्याची कला तर त्यांना अगदींच थोडी अवगत होती. त्यांनीं १८६१ पासून १८७१ पर्यंत मधून

मधून ज्या लढाया आणि हल्ले केले त्यावरून फक्त एवढेंच दिसून आलें कीं, शत्रूचें बल कितीहि मोठें असलें तरी त्याला घाबरावयाचें नाहीं, व त्याला तोंड द्यावयाचें, एवढीच धमक त्यांच्यांत होती. तथापि त्या मावरी लोकांची विरोधशक्ति अखेरीस पूर्ण नष्ट झाली, व १८७१ नंतर त्यांनीं मुळींच लढाई केली नाहीं. " ब्रिटिश सत्तेखालींच स्वराज्याचे हक्क भोगणारे दुसरे रानटी लोक म्हणजे गिलबर्ट व इलिस या बेटांतले रहिवासी होत. मावरी व हे रानटी लोक संख्येनें थोडे आहेत ही गोष्ट खरी; पण तेहि स्वराज्याचे हक्क भोगीत आहेत. यावरून 'जित झाल्यामुळें नागरिकत्वाचा हक्क नष्ट होतो' हा सिद्धांत सपशेल खोटा ठरतो.

## इतर राष्ट्रांतील उदाहरणें.

ब्रिटिश राज्याशिवाय इतर देशांच्या इतिहासांतूनहि अशा तऱ्हेचीं अनेक उदाहरणें देतां येतात. अमेरिकेनें फिलिपिनो लोकांना १७ वर्षांपूर्वी जिंकलें. पण अर्धे सुधारलेले व अर्ध रानटी असे हे लोक सुमारें १० वर्षांपासून स्वराज्याचे हक्क उपभोगीत आहेत; व आणखी १०—२० वर्षांत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य किंवा पूर्ण स्वराज्य मिळण्याचें अभिवचनहि मिळालेलें आहे. सर्वियावर कित्येक शतकेंपर्यंत तुर्कांचा सुलतानी अंमल चालू होता. पण युरोपमधील ख्रिश्चियन राष्ट्रांच्या मदतीनें व बर्लिनच्या तहाच्या अटींप्रमाणें त्याला १८७८ मध्यें स्वातंत्र्य मिळालें, आणि तेव्हांपासून सर्वियामध्यें त्यांचाच राजा व त्यांचेच लोक आपला कारभार उत्तम रीतीनें चालवीत आहेत. बल्गेरियाचाहि इतिहास असाच आहे. तेंहि तुर्कांच्या सत्तेखालीं कित्येक शतकेंपर्यंत होतें. पण युरोपियन राष्ट्रांच्या मदतीनें त्याला १९०८ मध्यें स्वातंत्र्य मिळालें, तेव्हांपासून त्याचाच राजा व त्याचेच लोक यांनीं स्वतःचा कारभार स्वतः चालविला आहे, व त्यांची अपात्रता दाखविणारी अशी एकहि गोष्ट त्यांच्या हातून घडली नाहीं.

वर दिलीं आहेत यांपेक्षां जास्त उदाहरणें देण्याची जरूरी नाहीं. जितत्व आणि परावलंबित्व यांच्या योगानें स्वतःचा कारभार स्वतः चालविण्याची पात्रता नष्ट होत नाहीं किंवा तो अधिकार काढूनहि घेतां येत

नाहीं, व तसें करणें न्याय्य होणार नाहीं हें दाखविण्याला वरील उदाहरणें पुरेशीं आहेत. आणि वस्तुतः असेंच होणें रास्त आहे. एखाद्या मनुष्यानें, मग तो चांगला असो किंवा वाईट असो, सशस्त्र असो किंवा अशस्त्र असो त्यानें जर दुसऱ्याचा पराभव केला तर पराभव करणारा, त्याचे वंशज व वारस, यांनीं पराभूत झालेले त्याचे वंशज व वारस यांचा, स्वतःची मालमत्ता बाळगण्याचा व तिचा उपभोग घेण्याचा हक्क छिनून घ्यावा, अथवा त्यांचा तो हक्क नष्ट करावा हें कोणत्याहि देशांत न्यायाचें मानलें जात नाहीं.

## प्रस्तुतकालीन इतिहास

आतां थोडेसें प्रस्तुतच्या इतिहासाकडेस पाहूं. बेल्जम हें सरासरी ८० वर्षांपासून स्वतंत्र राष्ट्र आहे. तें आपला कारभार स्वतःच चालवीत आहे, व त्यानें शिक्षण, व्यापार, व उद्योगधंदे यांत बरीच प्रगति केली आहे. जर्मनीनें बेल्जमला जिंकलें. पण तेवढ्यावरून त्याचें स्वातंत्र्य व स्वावलंबित्व नष्ट होणेंच रास्त आहे असें इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांना वाटत नाहीं, किंवा बेल्जम स्वराज्याला अपात्र आहे असेंहि सिद्ध होत नाहीं. उलटपक्षीं, बेल्जमचें स्वातंत्र्य त्याला पुनः मिळवून देण्याकरितां दोस्त राष्ट्रें खटपट करीत आहेत, आणि तें योग्यच आहे. बल्गेरिया आणि जर्मनी यांनीं सर्वियालाहि जिंकलें आहे. पण त्यालाहि पुनः स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां दोस्त राष्ट्रें प्रयत्न करीत आहेत. पुष्कळ दिवसांपूर्वीं पोलंडचे तुकडे करून जर्मनी, आस्ट्रिया आणि रशिया यांनीं आपल्या राज्यांत सामील करून घेतले आणि त्यावर तेच राज्य करूं लागले. पण सांप्रतची युरोपांतील लढाई चालू असतांनांच रशिया व जर्मनी या दोघांनींहि त्याला स्वातंत्र्य देण्याचें अभिवचन दिलेलें आहे. जितत्व आणि बरेच दिवस दुसऱ्याच्या सत्तेखालीं राहणें यावरून स्वराज्याची जर अपात्रता ठरत असेल तर पोलंडचे लोक स्वातंत्र्याला पात्र एकदम कसे झाले ?

## हिंदुस्थानांतील जाती, पंथ व मतें.

" हिंदुस्थान हें एक मोठ्या खंडाप्रमाणेंच आहे; त्यांत भाषा, जाती, पंथ व मतें हीं पुष्कळ आहेत; म्हणून हिंदुस्थानला होमरूल—स्वराज्य—

जुळणार नाहीं." असें कांहीं लोकांचें मत आहे. पण रशिया देखील फार मोठा आहे व त्यांतहि निरनिराळ्या जाती आहेत, निरनिराळे धर्म-पंथ आहेत, आणि निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक आहेत. तथापि त्यांतील लोक स्थानिक स्वराज्याचे हक्क उपभोगीत आहेत आणि साम्राज्य-कारभारांतहि त्यांचें बरेंच अंग आहे. आस्ट्रोहंगेरियन राष्ट्रांत देखील निर-निराळ्या भाषा, निरनिराळे पंथ व निरनिराळ्या जाती आहेत; तथापि तेथील राज्यपद्धति सदनशीर असून ती बऱ्याच अंशानें प्रातिनिधिक तत्वावर चाललेली आहे. अमेरिकेंतील युनायटेड स्टेटसमध्यें निरनिराळ्या भाषा बोलणारे, निरनिराळ्या जातींचे, व निरनिराळ्या पंथांचे लोक आहेत. पण तेथील राज्यपद्धति प्रजासत्ताकच आहे. हिंदुस्थानांत भाषा बोलण्याचे वेगवेगळे प्रकार वगळून देखील ज्या निरनिराळ्या भाषा बोलल्या जातात त्यांची संख्या बरीच फुगवून दाखविलेली असते. १९०१ च्या खानेसुमारींत ही संख्या १४७ होती व १९११ च्या खानेसुमारींत ही संख्या २२० पर्यंत वाढली ! वास्तविक पहातां, कोणताहि प्रांत घेतला तरी हिंदुस्था-नांतील बारा मुख्य भाषांमध्यें एक तरी भाषा सर्व लोकांना समजत असतेच. शिवाय, सर्व हिंदुस्थानला एक स्वराज्य देण्याच्या विरुद्ध भाषांच्या अनेक-त्वाची तक्रार फार जोराची आहे असें जरी गृहीत धरलें तरी प्रांतिक स्वराज्याला तरी या भाषांची हरकत येत नाहीं. बिहार, ओरिसा, बंगाल, आंध्र इत्यादिकांच्या संयुक्त प्रांतांत एक मुख्य भाषा सर्व लोकांना कळतेच, आतां आमचे निरनिराळे पंथ व निरनिराळीं मतें यासंबंधानें जर पाहिलें तर पाश्चात्यांपैकीं कोणत्याहि ख्रिश्चियन देशांत असलेल्या निरनिराळ्या पंथाच्या लोकांपेक्षां हिंदुस्थानचे लोक खरोखर अनुदार नाहींत.

## पौर्वात्य लोक व एकतंत्री राज्यपद्धति.

कधीं कधीं असें म्हणतात कीं "पौर्वात्य लोकांना एकतंत्री राज्यप-द्धतीचीच संवय आजपर्यंत झालेली असल्यामुळें त्यांना तीच आवडते; स्वराज्याची त्यांना किंमतच कळत नाहीं व ते त्याला लायकहि नाहींत." अगोदर ' पौर्वात्यदेशांत आजपर्यंत सर्व काळीं एकतंत्री राज्यपद्धति चालत

आली आहे ' हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. हिंदुस्थानांत पूर्वकाळीं कोणकोणत्या राज्यपद्धति चालू होत्या व कमी—जास्त मानानें त्या कशा लोकसत्तात्मक होत्या याची कल्पना आम्हीं वर दिलेल्या वर्णनावरून होतेच तथापि, आम्हाला एकतंत्री राज्यपद्धतीचीच संवय पूर्वी झालेली असती तरी कांहीं हरकत नाहीं. पाश्चात्यांतील जे लोक आज प्रजासत्ताक पद्धतीचा किंवा नियंत्रित राज्यपद्धतीचा उपभोग घेत आहेत त्यांच्या देशांत सुद्धां पूर्वी एके काळीं एकतंत्री राज्यपद्धति चालू होती असें इतिहास सांगत आहे. पौर्वात्य देशांविषयीं म्हणाल तर जपाननें आज ५० वर्षांपासून प्रातिनिधिक पद्धति अमलांत आणली आहे आणि त्यामुळें तें फार प्रबल होऊन भरभराटीस येत आहे. चीनमध्यें जरी अद्यापि एकाचीच सत्ता चालतेशी दिसते तरी वस्तुतः तें प्रजासत्ताकच आहे. तेथें राजसत्ताक पद्धति अमलांत आणण्याचा प्रयत्न केल्यामुळें जीं बंडें झालीं त्यावरून लोकसत्तेची जाणीव लोकांच्या अंतःकरणांत कशी व किती बिंबली आहे हें सहज दिसून येतें. मांच्यूंच्या अंमलांत व त्याच्याहि पूर्वी, लोकांनीं स्थानिक स्वराज्याचा बऱ्याच अंशानें उपभोग घेतलेला आहे. इराणमध्यें देखील सदनशीर राज्यपद्धती व पार्लमेंट स्थापन झालेलें आहे. पण युरोपियन राष्ट्रांचे परस्पर—विरुद्ध हितसंबंध व त्यांची राजकीय कारस्थानें यामुळें इराणांतील लोकांना स्वराज्याविषयींची आपली पात्रता दाखविण्याला सवड मिळत नाहीं. तथापि, एकट्या जपानच्या विजयामुळें देखील पौर्वात्य लोक स्वराज्याला लायक असूं शकतात असें म्हणण्याला कांहीं हरकत नाहीं.

## एतद्देशीय संस्थानांतील स्वराज्य.

हिंदुस्थानांतील नेटिव संस्थानांमध्यें, संस्थानिक, मुख्य अधिकारी व हाताखालचे अधिकारी हे सर्वच एतद्देशीय आहेत. म्हैसूर, बडोदा, ग्वालेर, त्रावणकोर आणि इतर लहान लहान संस्थानें यांमधून चाललेला राज्यकारभार एकंदरींत ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील राज्यकारभाराप्रमाणेंच व्यवस्थित रीतीनें चालला आहे. कांहीं कांहीं संस्थानांनीं तर भौतिक उन्नति, शिक्षण उद्योगधंद्याची वाढ, आणि न्याय व अंमलबजावणी यांची विभागणी

या बाबतींत हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारच्याहि पुढें आघाडी मारली आहे. आतां यांत शंका नाहीं कीं परचक्रापासून त्या संस्थानांचें रक्षण करण्याचें व अंतःस्थ दंगेधोपे वगैरे मोडण्याचें अभिवचन त्यांना ब्रिटिश सरकारनें दिलें आहे व आपल्या पोलिटिकल एजंटाच्यामार्फत त्यांना सल्लामसलतहि दिली जाते. पण आम्ही ब्रिटिश इंडियांतील लोक तरी ब्रिटिशसरकारचा संबंध तावडतोब तुटावा असें म्हणतच नाहीं. ब्रिटिश-साम्राज्याच्या संरक्षणाखालींच आम्हाला होमरूल—स्वराज्य—पाहिजे, अशीच मागणी कांग्रेस व मॉस्लेम लीग यांची आहे.

भूगोल व समाजशास्त्र यांच्या दृष्टीनें पाहिलें असतां नेपाळ हा हिंदुस्थानचाच एक भाग आहे. पण ब्रिटिशांच्या संरक्षणावांचून व सल्ल्या-वांचून नपाळ आपला कारभार स्वतःच पहात आहे. आतां ही गोष्ट खरी कीं हिंदुस्थानांतील एकहि संस्थान किंवा नेपाळ देखील युरोपांतलि कोण-त्याहि राष्ट्रापुढें टिकाव धरणार नाहीं. पण बेल्जम, सर्व्हिया व मांटेनिग्रो यांना देखील ट्युटानिक राष्ट्रापुढें ( जर्मनीपुढें ) टिकाव धरतां आला नाहीं. ट्युटानिक राष्ट्रानें मनांत आणलें तर डेनमार्क व हालंड यांना देखील ती सहज जिंकतील. पण एवढ्यावरून बेल्जम, सर्व्हिया, मांटेनिग्रो, डेनमार्क व हालंड यांतील लोकांना स्वतःचा कारभार स्वतः चालविण्याचा हक्क नाहीं असें ब्रिटिश, फ्रेंच किंवा त्यांचे स्नेही म्हणू शकतील काय ? आणि तें रास्त तरी होईल काय ?

असें कदाचित कोणी म्हणतील कीं लहान संस्थानचा कारभार चालवितां आला म्हणजे त्यावरून हिंदुस्थानासारख्या प्रचंड राष्ट्राचा कारभार चाल-विण्याची पात्रता आहे असें सिद्ध होत नाहीं. या म्हणण्याला आम्ही दोन तऱ्हेनें उत्तर देतों. ( १ ) लहान संस्थानचा कारभार चालविण्याची पात्रता आमच्यांत आहे ही गोष्ट कबूल केली तर, हिंदुस्थानांतील साम्राज्य-कारभाराचा प्रश्न बाजूला ठेवून, तूर्त आम्हाला प्रांतिक स्वराज्य, जिल्हा स्वराज्य, किंवा म्युनिसिपालिटांतील तरी स्वराज्य द्यायला कांहीं हरकत नाहीं. लोकांचे हात तर ग्रामसंस्थांतून देखील जखडल गेले आहेत. ( २ ) ब्रिटिश

वसाहतींपैकीं कांहीं वसाहतवाल्यांची संख्या व विस्तार दोन्ही लहान आहेत. तथापि त्यांनीं आपला कारभार स्वतःच चालविण्यांत जे यश संपादन केलें आहे त्यावरून त्यांची योग्यता सिद्ध झाली आहे. असें समजून लढाईनंतर साम्राज्याच्या कारभारांत घेण्याबद्दल ब्रिटिश प्रधानमंडळानें त्यांना वचन दिलेलें आहे. लार्ड चेम्सफर्ड हे पूर्वीं न्यूसाउथवेल्स व क्वीन्स आयलंड येथें गव्हर्नर होते, व लंडन मधील एका काउंटीचे कौंसिलर होते. पण तेवढ्यावरून हिंदुस्थानचे व्हाइसराय होण्याला ते लायक आहेत असें समजलें गेलें आहे. असें जर आहे तर सर सालरजंग, शेषाद्रिआयर, दिनकरराव, रमेशचंद्र इत्यादिकांनीं एतद्देशीय संस्थानांतून उत्तम रीतीनें कारभार केला आहे. यावरून एतद्देशीयांच्या अंगीं साम्राज्याचा कारभार करण्याची पात्रता आहे असें कां म्हणूं नये ? युरोपांतील कांहीं स्वतंत्र देश देखील लहानच आहेत. पण त्यांच्या स्वराज्याच्या हक्काबद्दल तर कोणी शंकाहि घेत नाहीं. खालीं आम्ही कोष्टक दिलें आहे त्यावरून एतद्देशीय संस्थानें, ब्रिटिश वसाहती व युरोपांतील कांहीं स्वतंत्र देश यांची तुलना करावयास ठीक पडेल.

| **नेटिव्ह संस्थानें. नांव.** | **विस्तार चौरस मैल.** | **लोकसंख्या.** |
|---|---|---|
| ग्वालेर | २५१०७ | ३०९३०८२ |
| त्रावणकोर | ७१२९ | ३४२८९७५ |
| बडोदा | ८१८२ | २०३२७९८ |
| म्हैसूर | २९४५९ | ५८०६१९३ |
| हैदराबाद | ८२६९८ | १३३७४६७६ |
| **ब्रिटिश वसाहती.** | | |
| न्यूफाउंडलंड | ४०००० | २४०००० |
| न्यूझीलंड | १०५००० | १००००० |
| न्यू-साउथ-वेल्स | ३१०४०० | १६५०००० |
| व्हिक्टोरिया | ८८००० | १३२०३००० |
| क्वीन्सलंड | ६७०५०० | ६०६००० |

| | | |
|---|---|---|
| **युरोपांतील देश.** | | |
| बेल्जम | ११३७३ | ७५७१३८७ |
| डेनमार्क | १५५८२ | २७७५०७६ |
| हालंड | १२५८२ | ६२१२७०१ |
| स्विट्झरलंड | १५९७६ | ३८३१२२० |
| मॉंटेनिग्रो | ५६०३ | ५१६००० |
| सर्विया | १८६५० | २९११००१ |

याशिवाय दक्षिण अमेरिकेंतील प्रजासत्ताक पद्धतीचा उपभोग घेणारे चिली, अरजेंटाइन रिपब्लिक यांचेहि आंकडे दिले असते. पण त्याची कांहीं जरूरी नाहीं.

## स्वसंरक्षणाचें सामर्थ्य.

इंग्लिशमनसारखे अंग्लोइंडियन पत्रकर्ते म्हणतात कीं, " जो देश; स्वतःचा पैसा, स्वतःचें बळ इत्यादि प्रकारानें सर्व तऱ्हेनें स्वसंरक्षणाकरतां स्वतःच्या पायांवर उभा राहूं शकत नाहीं, त्या देशाची आपला कारभार स्वतःच चालविण्याची तयारी नाहीं हें उघड आहे. " पण ब्रिटिश वसाहतीमध्यें एक तरी वसाहत अशी आहे कां कीं जी या सर्व गोष्टींत स्वतःच्या पायावर उभी राहूं शकतें ? त्यांच्यापैकीं एक तरी वसाहत आपलें रक्षण स्वतःच करूं शकते काय ? जर ब्रिटिशसाम्राज्यसत्तेचा पाठिंबा नसता तर जपाननें आस्ट्रेलेशियाला व युनायटेडस्टेस ( अमेरिका )नें कानड्याला तेव्हांच आपल्या राज्यांत सामील करून घेतलें असतें. बोअर लढाई सुरू झाली तेव्हां दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश वसाहतीरक्षणाकरितां सर्वांच्या अगोदर हिंदुस्थानची फौज तेथें उतरली. याप्रमाणें ब्रिटिश वसाहती जरी आपलें रक्षण स्वतःच करूं शकत नाहींत, तरी त्या स्वराज्याला अपात्र आहेत असें कोणीही म्हणत नाहीं !

फ्रान्सला देखील, एकट्यालाच स्वतःचें रक्षण करतां येतें काय ? निःसंशय नाहीं. नाहींतर ब्रिटिशांची व हिंदुस्थानची फौज फ्रान्सच्या रक्षणाकरितां फ्रेंच किनाऱ्यावर उतरलीच नसती. स्वतःच्या संरक्षणाला इंग्लंड तरी एकटे

समर्थ आहे काय ? नाहीं, हेंहि निःसंशयच आहे; कारण त्यानें आपल्या दोस्तांची व वसाहतींची मदत मागून घेतलेली आहे. अहो, या दुर्बळ आणि तिरस्कृत हिंदुस्थानची देखील मदत त्याला टाकवली नाहीं. आणि म्हणूनच हिंदपुत्रांना ब्रिटिश साम्राज्याकरितां युरोप आशिया व आफ्रिका या तिन्ही खंडांत लढाईवर पाठविण्यांत आलें आहे. जर्मनी देखील स्वतःच्या बळावर उभा राहूं शकत नाहीं, तर त्यालाही दोस्तांची मदत पाहिजेच. तेव्हां ' जो देश स्वतःचें रक्षण स्वतःच्या बलानें करूं शकत नाहीं, त्या देशाचा स्वतःचा कारभार स्वतः चालविण्याची तयारी नाहीं ' हा सिद्धांत खरा नाहीं.

## आर्थिक स्वातंत्र्य ( स्वतःचा पैसा ).

आतां आर्थिक स्वातंत्र्यासंबंधानें जर पाहिलें तर, आम्हाला असा एकहि सुधारलेला देश माहीत नाहीं कीं ज्यांत परदेशचें भांडवल गुंतलेलें नाहीं. जपान, पर्शिया, चीन इत्यादि आशियांतील राष्ट्रें तर राहोत, पण युरोपांतील रशियासारखे स्वतंत्र देश देखील परदेशी भांडवलावरच भरभराटीस येत आहेत. खुद्द इंग्लंडमध्यें जर्मनीचा कोट्यावधी पैसा गुंतला आहे आणि त्याचप्रमाणें जर्मनीमध्येंहि इंग्लंडचा पैसा गुंतला आहे. सांप्रतच्या युद्धांत इंग्लंडला दोस्तराष्ट्रांना पैशाची मदत करावी लागत आहे; आणि स्वतः इंग्लंडला पैशाकरितां अमेरिकेचा बाजार पहावा लागत आहे. यावरून आर्थिक स्वातंत्र्य स्वराज्याच्या पात्रतेला अत्यंत जरूर आहे असें दिसत नाहीं.

या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवणें विषयाला सोडून होणार नाहीं ती ही कीं, सांप्रत इंग्लंडची जी श्रीमंती दिसून येत आहे तिला कारण हिंदुस्थानांतून नेलेलें भांडलल आहे. मिलचा ' हिंदुस्थानचा इतिहास ' व ब्रूक्स अडम्सचे ' सुधारणा व तिचा नाश याचा कायदा ' हे ग्रंथ वाचणाराला कळून

१ या विषयासंबंधानें वरील ग्रंथाशिवाय खालील पुस्तकेंहि पाहावीत. दादाभाई नौरोजी यांचें Poverty and un-British Rule in India. व रमेशचंद्रदत्त यांचें Economic India.

येईल कीं हिंदुस्थानांतला सांठवलेला शेकडो कोटी पैसा जर ग्रेटब्रिटनमध्यें गेला गेला नसतां तर आज ब्रिटिशांची जी उद्योग-धंद्याची भरभराट दिसून येत आहे ती मुळींच दिसून आली नसती.

## “ रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं. ”

आम्हाला अंग्लोइंडियन्स आणि कांहीं इंडियन्स सुद्धा नेहमीं म्हणतात कीं तुम्ही ‘ रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं ’ ही म्हण लक्षांत ठेवा. या म्हणण्याचा अर्थ असा कीं इंग्लंड व इतर स्वतंत्र व स्वराज्याचा उपभोग घेणारीं राष्ट्रें, यांना आजच्या स्थितीला येण्याला आणि आजच्यासारख्या सुधारलेल्या राजकीय संस्थांची व्यवस्था करण्याचें शिकण्याला कित्येक शतकें लागलीं. तेव्हां हिंदुस्थाननें देखील थोड्याशा वर्षांतच स्वतःचा कारभार स्वतःच चालविण्याची अपेक्षा करूं नये. आम्हीं शाळेंत जीं इतिहासाचीं लहान लहान पुस्तकें वाचलीं त्यावरून आम्हाला खरोखरच कळलें कीं थोड्याशा झोपड्यांपासून तो रोम्युलस व रेम्युअस यांनीं बांधलेले राजवाडे, प्रार्थनामंदिरें व भव्य उपवनें येथपर्यंत रोमची प्रगति होण्याला कित्येक शतकें लागलीं. पण त्यानंतर वाशिंग्टन, मेलबोर्न, सिडने, सान् फ्रान्सिस्को, चिकागो, किंवा नवीन डाका, हीं शहरें बांधलीं जाण्याला तितका काळ लागला नाहीं ! किंवा नवीन दिल्ली किंवा नवीन बांकीपूर बांधलें जाण्याला तितकीं शतकें तर नाहींच पण तितकीं दशकेंहि लागतील असें वाटत नाहीं. आजच्या काळाला जें अत्यंत सुधारलेलें वाफेचें एंजिन आहे त्याचें मूळ जर पाहूं गेलें तर तें इसवी सनापूर्वीं १३० वे वर्षी हिरोनें जें एक यंत्र तयार केलें त्यांत सांपडतें. पण मेकॅनिकल एंजिनिअरिंगच्या एखाद्या विद्यार्थ्याला स्टीम एंजिन ( वाफेचें एंजिन ) कसें करावें हें जर आज शिकावयाचें असेल तर त्याला हिरोच्या यंत्रापासून सुरुवात करावी लागत नाहीं किंवा त्याला ही कला शिकण्याला १३० + १९१५=२०४५ वर्षेंहि लागत नाहींत. तर थोड्याश्या वर्षांतच हुशार मेकॅनिक ( यंत्रें तयार करणारा ) होतो. रसायनशास्त्र आजला ज्या चमत्कारजनक गोष्टी करीत आहे त्याचें मूळ कित्येक शतकांपूर्वीं प्रचलित असलेल्या किमियेंत होतें. पण आज जो विद्यार्थी रसायनशास्त्र शिकतो तो

तितकीं शतकेंपर्यंत अनेक जन्म घेऊन खटपट करीत नसतो. जहाज बांधण्याची कला शिकणारा विद्यार्थी, पूर्वकाळीं जीं लांकूड किंवा दगड कोरून जहाजें करीत तेथपासून सुरवात करीत नाहीं, तर आजच्या अत्यंत सुधारलेल्या जहाजापासून सुरवात करतो व थोड्याच वर्षांत अत्यंत सुधारलेली अशी व्यापारी जहाजें किंवा ड्रेडनाटस् (बेडर जातीचीं लढाऊ जहाजें) तयार करण्यांत तरबेज होतो. सैन्याकरितां अथवा आरमाराकरितां शस्त्रें तयार करणाऱ्या कारागिराला, पदार्थसंग्रहालयांत जाऊन पूर्वींचे पॅलिओलिथिक किंवा निओलिथिक लोक दगडाच्या कुऱ्हाडी व गारेच्या बरच्या व बाण कसे करीत हें पाहून त्याप्रमाणें करावें लागत नाहीं. तर अगदीं थोड्या वर्षांत तो १४ इंची तोफ, गाळे आणि टारपेडो (पाणतीर) करावयास शिकतो. आलीकडील जपानी लोक पाश्चात्यांपासून असेंच शिकले व आज कांहीं बाबतींत तर पाश्चात्यानांच शिकवीत आहेत व त्यांना मदत करीत आहेत. आजला वयोवृद्ध मुत्सद्दी म्हणून असलेले जपानी लोक ५० वर्षांपूर्वी, तरुण असतांना राज्यकारभाराची कला शिकण्याकरितां जेव्हां जगांतील सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत गेले, तेव्हां त्यांनीं अंग्लोसॅक्सनच्या वेळेस 'विटनेजिमॉट' (पार्लमेंट) 'अरलस' व 'सिओरलस' आणि 'स्लिटस' यांचा अभ्यास करण्याचा आपल्या डोक्याला त्रास दिला नाहीं तर आजला प्रचलित असलेल्या प्रातिनिधिक पद्धतीच्या संस्था व त्यांचें कार्यकारित्व यांचाच अभ्यास करण्याला एकदम सुरवात केली व थोडक्याच वर्षांत सर्व गोष्टी शिकले आणि पुढें अनुभवानें आजच्या पदवीला पोचले.

इतर कलेप्रमाणें मुत्सद्देगिरीची कला एकाच जन्मांत शिकतां येते. फार मोठा मुत्सद्दी म्हणून पुढें प्रसिद्ध होणारें ब्रिटिश बालक जन्माला येतें तेव्हां हिंदुस्थानांत जन्माला येणाऱ्या बालकाइतकेंच अडाणी असतें. ब्रिटिश बालक जन्माला येतें तेव्हां आपल्या बरोबर कांहीं सेनापतीचा दंड किंवा मुत्सद्याचें पुडकें घेऊन येत नाहीं; किंवा हिंदुस्थानांतील बालक जन्माला आलें म्हणजे आपल्याबरोबर मजुराचें फावडें किंवा दगड फोडावयाचा घण घेऊन येत नाहीं. सारख्याच सवलती मिळाल्या तर हिंदुस्थानांतील बालक इतर कोणत्याही बालकाच्या बरोबरीनें पुढें येईल. मुत्सद्देगिरी जर सर्वच किंवा अंशतः

येईल कीं हिंदुस्थानांतला सांठवलेला शेकडो कोटी पैसा जर ग्रेटब्रिटनमध्यें नेला गेला नसतां तर आज ब्रिटिशांची जी उद्योग-धंद्याची भरभराट दिसून येत आहे ती मुळींच दिसून आली नसती.

## " रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं. "

आम्हाला अंग्लोइंडियन्स आणि कांहीं इंडियन्स सुद्धा नेहमीं म्हणतात कीं तुम्ही ' रोम एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं ' ही म्हण लक्षांत ठेवा. या म्हणण्याचा अर्थ असा कीं इंग्लंड व इतर स्वतंत्र व स्वराज्याचा उपभोग घेणारीं राष्ट्रें, यांना आजच्या स्थितीला येण्याला आणि आजच्यासारख्या सुधारलेल्या राजकीय संस्थांची व्यवस्था करण्याचें शिकण्याला कित्येक शतकें लागलीं. तेव्हां हिंदुस्थाननें देखील थोड्याशा वर्षांतच स्वतःचा कारभार स्वतःच चालविण्याची अपेक्षा करूं नये. आम्हीं शाळेंत जीं इतिहासाचीं लहान लहान पुस्तकें वाचलीं त्यावरून आम्हाला खरोखरच कळलें कीं थोड्याशा झोपड्यांपासून तो रोम्युलस व रेम्युअस यांनीं बांधलेले राजवाडे, प्रार्थनामंदिरें व भव्य उपवनें येथपर्यंत रोमची प्रगति होण्याला कित्येक शतकें लागलीं. पण त्यानंतर वाशिंग्टन, मेलबोर्न, सिडने, सान् फ्रान्सिस्को, चिकागो, किंवा नवीन डाका, हीं शहरें बांधलीं जाण्याला तितका काळ लागला नाहीं ! किंवा नवीन दिल्ली किंवा नवीन बांकीपूर बांधलें जाण्याला तितकीं शतकें तर नाहींच पण तितकीं दशकेंहि लागतील असें वाटत नाहीं. आजच्या काळाला जें अत्यंत सुधारलेलें वाफेचें एंजिन आहे त्याचें मूळ जर पाहूं गेलें तर तें इसवी सनापूर्वीं १२० वे वर्षीं हिरोनें जें एक यंत्र तयार केलें त्यांत सांपडतें. पण मेकॅनिकल एंजिनिअरिंगच्या एखाद्या विद्यार्थ्याला स्टीम एंजिन (वाफेचें एंजिन ) कसें करावें हें जर आज शिकावयाचें असेल तर त्याला हिरोच्या यंत्रापासून सुरुवात करावी लागत नाहीं किंवा त्याला ही कला शिकण्याला १२० + १९१५=२०४५ वर्षेंहि लागत नाहींत. तर थोड्याश्या वर्षांतच हुषार मेकॅनिक ( यंत्रें तयार करणारा ) होतो. रसायनशास्त्र आजला ज्या चमत्कारजनक गोष्टी करीत आहे त्याचें मूळ कित्येक शतकांपूर्वीं प्रचलित असलेल्या किमियेंत होतें. पण आज जो विद्यार्थी रसायनशास्त्र शिकतो तो

तितकीं शतकेंपर्यंत अनेक जन्म घेऊन खटपट करीत नसतो. जहाज बांधण्याची कला शिकणारा विद्यार्थी, पूर्वकाळीं जीं लांकूड किंवा दगड कोरून जहाजें करीत तेथपासून सुरवात करीत नाहीं, तर आजच्या अत्यंत सुधारलेल्या जहाजापासून सुरवात करतो व थोड्याच वर्षांत अत्यंत सुधारलेली अशीं व्यापारी जहाजें किंवा ड्रेडनाटस् (बेडर जातीचीं लढाऊ जहाजें) तयार करण्यांत तरबेज होतो. सैन्याकरितां अथवा आरमाराकरितां शस्त्रें तयार करणाऱ्या कारागिराला, पदार्थसंग्रहालयांत जाऊन पूर्वींचे पॅलीओलिथिक किंवा निओलिथिक लोक दगडाच्या कुऱ्हाडी व गारेच्या बरच्या व बाण कसे करीत हें पाहून त्याप्रमाणें करावें लागत नाहीं. तर अगदीं थोड्या वर्षांत तो १४ इंची तोफ, गाळ आणि टारपेडो (पाणतीर) करावयास शिकतो. आलीकडील जपानी लोक पाश्चात्यांपासून असेंच शिकले व आज कांहीं बाबतींत तर पाश्चात्यानांच शिकवीत आहेत व त्यांना मदत करीत आहेत. आजला वयोवृद्ध मुत्सद्दी म्हणून असलेले जपानी लोक ५० वर्षीं पूर्वीं, तरुण असतांना राज्यकारभाराची कला शिकण्याकरितां जेव्हां जगतांतील सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत गेले, तेव्हां त्यांनीं अंग्लोसॅक्सनच्या वेळेस 'विटनेजिमॉट' (पार्लमेंट) 'अरलस' व 'सिओरलस' आणि 'स्निटस' यांचा अभ्यास करण्याचा आपल्या डोक्याला त्रास दिला नाहीं तर आजला प्रचलित असलेल्या प्रातिनिधिक पद्धतीच्या संस्था व त्यांचें कार्यकारित्व यांचाच अभ्यास करण्याला एकदम सुरवात केली व थोडक्याच वर्षांत सर्व गोष्टी शिकले आणि पुढें अनुभवानें आजच्या पदवीला पोचले.

इतर कलेप्रमाणें मुत्सद्देगिरीची कला एकाच जन्मांत शिकतां येते. फार मोठा मुत्सद्दी म्हणून पुढें प्रसिद्ध होणारें ब्रिटिश बालक जन्माला येतें तेव्हां हिंदुस्थानांत जन्माला येणाऱ्या बालकाइतकेंच अडाणी असतें. ब्रिटिश बालक जन्माला येतें तेव्हां आपल्या बरोबर कांहीं सेनापतीचा दंड किंवा मुत्सद्याचे पुडके घेऊन येत नाहीं; किंवा हिंदुस्थानांतील बालक जन्माला आलें म्हणजे आपल्याबरोबर मजुऱ्याचे फावडें किंवा दगड फोडावयाचा घण घेऊन येत नाहीं. सारख्याच सवलती मिळाल्या तर हिंदुस्थानांतील बालक इतर कोणत्याही बालकाच्या बरोबरीनें पुढें येईल. मुत्सद्देगिरी जर सर्वच किंवा अंशतः

तरी आनुवंशिक संस्कारानें यावयाची असती तर बहुतेक सर्व मुत्सद्यांचीं मुलें मुत्सद्दीच झालीं असतीं आणि ज्यांचे बाप मुत्सद्दी नाहींत अशीं बालकें पुढें क्वचितच मुत्सद्दी म्हणून नांवाजलीं गेलीं असतीं–अब्राहाम लिंकन हा अशक्यच झाला असता. ( कारण त्याचा बाप मुत्सद्दी नव्हता. ) मि. अस्क्विथ जें कांहीं शिकले तें याच जन्मांत शिकले. काउंट ओक्युमा देखील तितक्याच अवधींत शिकले. दादाभाई नौरोजीची तरी तीच गोष्ट आहे. आणि अशोक, चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, शेरशहा, अकबर, औरंगजेब, शिवाजी इत्यादिकांची देखील हीच गोष्ट आहे. त्यांच्या पूर्वजांनीं कांहीं मुत्सद्देगिरीच्या ज्ञानाचें व अनुभवाचें गाठोडें बांधुन त्यांच्या स्वाधीन केलें नव्हतें. आनुवंशिक संस्कारानें बुद्धि किंवा जातीचें वैशिष्ट्य येतें या म्हणण्यांत तथ्य असो किंवा नसो. पण ज्यांच्या हातांत सत्ता आहे व ज्यांना संधि मिळाल्या आहेत त्यांनीं " व्यक्ति किंवा राष्ट्र यांची भवितव्यता ठरविण्याकरतां त्याचा जन्म हेंच अतिशय प्रमुख कारण आहे " असें म्हणून त्यावर इतरांना विश्वास ठेवण्यास लावावें म्हणजे ही त्यांनीं जाणून किंवा न जाणून योजलेली लबाडीची युक्तिच आहे. ही युक्ति हिंदुस्थानांत पुष्कळ पिढ्यापर्यंत व बऱ्याच विस्तृत प्रमाणावर यशस्वी झाली. शूद्रांचा अद्यापिही आमच्या वेळेपर्यंत, असा विश्वास आहे का त्यांना जर ब्राम्हण किंवा द्विज ( क्षत्रिय; व वैश्य ) व्हावयाचें असेल तर त्यांनीं पुष्कळ जन्म घेऊन त्यांचे गुण आपल्या अंगां आणून घेतले पाहिजेत. पण या युक्तींतली सर्व जादू आतां हिंदुस्थानांत देखील नाहींशी झाली आहे. व आजपर्यंत जे शूद्र म्हणून प्रसिद्ध होते त्यांपैकीं पुष्कळ लोक आतां स्वतःला द्विज म्हणून हक्कानें म्हणूं लागले आहेत.

कोणतीही गोष्ट पूर्णत्वाला आणण्याला किंवा कोणत्याही पद्धतीचें तत्त्व शोधून काढण्याला वेळ बराच लागतो; त्याला मेहनतही जास्त पडते, व बुद्धिमत्ताही फार लागते. पण नंतर त्याचें ज्ञान करून घेणें हें फार सोपें व अल्पकाळाचें काम आहे.

मुत्सद्देगिरीची कला उदयाला येऊन पूर्ण होण्याला जरी कित्येक शतकें लागलीं, तरी ती शिकण्याला तितकीं शतकें किंवा पिढ्या सुद्धां लागत नाहींत. इतर कोणतीही कला, शास्त्र, किंवा कौशल्य पूर्ण व परिपक्व दशेला येण्याला

शतकें लागतात पण ती शिकण्याला तितकीं शतकें किंवा पिढ्या लागत नाहींत. जी गोष्ट इतर कलांची, तीच गोष्ट मुत्सद्देगिरीच्या कलेची होय. पण इतर कोणत्याही कलेसंबंधानें ही गोष्ट चटदिशीं कबूल करण्यांत येते; पण मुत्सद्देगिरीच्या कलेबद्दल मात्र ही गोष्ट नाकबूल केली जाते. तथापि घडून आलेल्या गोष्टी व त्यांवरून निघणारीं बिनतोड अनुमानें, हीं (वरील सिद्धांताच्या समर्थनार्थ) स्वराज्याची इच्छा करणाऱ्या व त्याकरितां धडपड करणाऱ्या राष्ट्रांच्या मदतीला धांवून येतात. कित्येक शतकेंपर्यंत टर्कांच्या सत्तेखालीं राहून सर्व्हिया, बल्गेरिया, व रुमानिया स्वतंत्र झाले ही गोष्ट अद्यापि कित्येकांच्या स्मरणांत देखील आहे. त्यांना मुत्सद्देगिरी शिकण्याला कांहीं शतकें किंवा पिढ्या लागल्या नाहींत, तर संधि आल्याबरोबर ते आपला कारभार स्वतःच अगदीं योग्य रीतीनें चालवूं लागले. 'ते लोक हिंदुस्थानच्या लोकांपेक्षां जास्त बुद्धिमान् आहेत, किंवा जास्त शूर आहेत, अथवा त्यांची सुधारणा हिंदुस्थानच्या सुधारणेहून जुनी आहे' असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. बरें, असें जर म्हणाल कीं 'ते युरोपिअन आहेत, आणि जी गोष्ट युरोपिअन लोकांना लागू आहे ती एशियांतील लोकांना लागू नाहीं,' तर आम्ही जपानचें उदाहरण देऊं. जपानचे लोक मायजी किंवा नवयुग याच्या सुरवातीपासूनच आपल्या देशाचा कारभार अत्यंत शिष्टसंमत अशा पद्धतीनें चालवीत आहेत. 'जपानच्या लोकांना राजकीय प्रगतीची ही नवी पद्धति झेपली, याचें कारण त्यांना जुन्या सुधारणेचें पाठबळ होतें' असें म्हणाल, तर फिलिपिनो लोकांना तर तसें कांहींच पाठबळ नव्हतें. तथापि अमेरिकन कारभाराखालीं सुमारें १० वर्षें अभ्यास करून लागलींच ते स्वराज्याचे अधिकार समाधानकारकरीतीनें चालवीत आहेत. आतां जर स्पष्ट शब्दांत किंवा पर्यायानें असेंच म्हणाल कीं 'तुम्ही हिंदी आहांत व ब्रिटिशांच्या सत्तेखालीं दीड शतकांपेक्षां जास्त काळापासून आहांत, हाच तुमच्यांत दोष आहे' तर मग आम्हाला निमूटपणें 'पूर्णपणें हरलों' असेंच म्हणणें भाग आहे.

## स्वराज्याच्या पात्रतेला ठरीव इयत्ता नाहीं.

स्वराज्याची पात्रता येण्याला कांहीं ठरीव इयत्ता नाहीं. इतर सर्व शक्ती-

प्रमाणें स्वराज्य चालविण्याच्या शक्तीचें प्रमाण देखील कमीजास्त आहे. पृथ्वीच्या पाठीवर असें एकहि राष्ट्र नाहीं कीं जें स्वराज्याला अगदीं सर्व तऱ्हेनें व पूर्णपणें योग्य आहे. आजला स्वतःचें राज्य स्वतः चालवीत आहेत म्हणून स्वराज्याला इंग्लिश लोक योग्य आहेत, आयरिश लोक योग्य आहेत, जर्मन योग्य आहेत, बेल्जन योग्य आहेत, मॅांटेनिग्रोचे लोक योग्य आहेत, जपानी व चिनी योग्य आहेत, एथिओपिअन्स योग्य आहेत, लिबेरियाचे निग्रो योग्य आहेत, हैटीचे निग्रो योग्य आहेत, रानटी मावरी व गिबर्ल्ट बेटांतील लोकहि योग्य आहेत, सर्व्हस, बोअर, बल्गर्स, फिलिपिनोस, आफगाण हेहि योग्य आहेत, व नेपाळी लोक देखील योग्य आहेत. पण या सर्वांनीं सारखीच प्रगति केली आहे कां? किंवा हे सर्व सारखेच बलवान झाले आहेत कां? राष्ट्राला स्वराज्य चालविण्याचें सामर्थ्य येण्याला अमुकच प्रमाण, अमुकच पद्धति, किंवा अमुकच माप ठरीव आहे असें ईश्वरानें ठरविलेलें नाहीं किंवा मनुष्याला किंवा राष्ट्रालाहि तसें ठरवितां येणें शक्य नाहीं. ब्रिटिश लोक असें समजतात कीं ते स्वराज्याला पूर्णपणें लायक आहेत. पण त्यांनीं देखील आपल्या देशाचा कारभार करतांना योग्य अशी पात्रता व कुशलता दाखविली असती तर इतक्या क्रांत्या, इतकीं बंडें व इतकी धामधुम होऊन इतका रक्तपात त्यांच्या देशाच्या इतिहासांत दिसून आलाच नसता. इतर सर्व लोकांप्रमाणें त्यांनीं देखील कित्येकदां मोठमोठ्या घोडचुका केल्या आहेत. सांप्रतची लढाई चालू असतांना देखील त्यांच्या हातून मोठ्या ढोबळ चुका झाल्या आहेत. पण अत्यंत भयंकर चुकामुळें देखील कोणतेंहि स्वतंत्र व स्वावलंबी राष्ट्र स्वराज्याला अपात्र ठरत नाहीं; आणि तें योग्यच आहे. तेव्हां 'हिंदुस्थानच्या लोकांना अनुभव नाहीं म्हणून त्यांना जर आपला कारभार स्वतःच चालवूं दिला तर ते चुका करतील; याकरितां त्यांना स्वराज्य योग्य नाहीं' या म्हणण्यांत अर्थ काय? ज्यानें चूक केली नाहीं, त्यानें कधींहि म्हणण्यासारखें असें कांहींच केलें नाहीं. जें पोर कधीं पडलें नाहीं किंवा अडखळलें नाहीं, तें कधींहि चालावयाला शिकलेंच नाहीं. राष्ट्र अशिक्षित व सामर्थ्यवान् होऊन प्रगतिपर होण्याला जशी यशाची तशीच अपयशाचीहि जरूर आहे.

# ब्रिटिशांची राज्यकारभाराची लायकी.

ब्रिटिशांनीं आपल्या देशांत राज्यकारभाराची फार मोठी पात्रता दाखविली आहे. पण हिंदुस्थानच्या कारभारांत त्यांनीं ती तितकी दाखविली नाहीं. त्यांनीं आमचे परचक्रापासून रक्षण केलें, देशांत शांतता आणि शिस्त राखिली, सरकारी सारा वक्तशीर व कडक रीतीनें वसूल केला व त्याचा खर्चहि केला, ठोकळ मानानें हिंदी लोकांच्या परस्पर भांडणांत व हिंदी व युरोपिअन यांच्या दिवाणी तंट्यांत निःपक्षपातबुद्धीनें न्याय दिला, ( हें सर्व त्यांनीं केलें. ) पण सरासरी दोन शतकें ते राज्य करीत असूनहि, शिक्षण, भौतिक भरभराट, आरोग्य, बाहेरील किंवा आंतील उपद्रवापासून स्वसंरक्षण करण्याची आमची शक्ति, आणि चोऱ्या व जंगली जनावरें यांच्या त्रासांतून आमची मुक्तता, या बाबतींत युरोपांतील अगदीं खालच्या दर्ज्याच्या राष्ट्राच्या किंवा जपानच्या बरोबरीला देखील त्यांनीं आम्हाला आणलें नाहीं. जगतांतील सर्व सुधारलेल्या देशामध्यें आमच्या देशाइतका, दुष्काळ, स्पर्शजन्य व साथीचे रोग वगैरे यांना बळी पडणारा दुसरा देश नाहीं. १५० वर्षांत आम्हीं जितके सुशिक्षित व हिंवतापाच्या त्रासांतून मुक्त झालों त्यापेक्षांहि जास्त अमेरिकेनें केवळ १७ वर्षांतच फिलिपिनो लोकांना सुशिक्षित व हिंवतापाच्या त्रासांतून मुक्त केलें. हिंवतापाशीं झगडण्यांत हिंदुस्थानांत सरकारला जितकें यश आलें त्यापेक्षांहि बरेंच जास्त यश फार्मोसा देशांत जपाननें संपादिलें आहे. अधिकारीवर्गाच्या कारभारापासून आमचें जें कल्याण झालें तें आम्हाला कबूल आहे; पण वर सांगितलेल्या, व विशेषतः आमची बौद्धिक व सांपत्तिक उन्नति या दोन कसाला लावून पाहतां आमच्या पात्रतेविरुद्ध अपात्रतेबद्दल मोठ्या आढ्यतेनें अधिकारीवर्गानें ( ब्युराक्रसी ) ओरड करावी असें त्यांना मुळींच यश आलें नाहीं. विशेषतः हिंदुस्थानांत सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे नैसर्गिक मार्ग पुष्कळ व अनेक प्रकारचे आहेत, व हिंदुस्थानच्या लोकांत बुद्धि, धैर्य, उद्योगीपणा, काटकसर, इमानीपणा, आणि दानतीला लागणारे इतर गुण कमी नाहींत. या दोन गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे ब्रिटिश सरकारला हिंदुस्थानांत जें

कांहीं यश आलेलें आहे तें अगदींच मिकार आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## दानत.

स्वराज्याची पात्रता ठरविण्याला ज्या कांहीं अत्यंत जरूर गोष्टी आहेत त्यांत दानत ही एक आहे. हिंदुस्थानांतील गुन्ह्यांचे आंकडे जर इतर कोणत्याहि सुधारलेल्या देशाच्या आंकड्यांशी ताडून पाहिले तर त्यांवरून आम्ही दानतीमध्यें कमी नाहीं असेंच दिसून येतें. लांच खाणें व सार्वजनिक पैशाचा अपहार करणें या गोष्टी अमेरिकेंतील युनायटेड स्टेटसमध्यें जितक्या विपुल आहेत तितक्या हिंदुस्थानांत मुळींच नाहींत. ज्या शतकांत इंग्लंडमध्यें पार्लमेंटच्या द्वारें राज्यकारभार चालत असे त्या शतकांमध्यें मुख्य प्रधान राजकीय खात्यांतील मोठे व लहान अधिकारी हे सर्व लांच खाणारे व इमानदारींत कमी, असे होते. इंग्लंडमधील सिव्हिल सर्व्हिससंबंधानें ज्या नुकत्याच चौकश्या झाल्या त्यांमधून पक्षपाताच्या मोठ्या ठळक ठळक गोष्टी बाहेर आल्या आहेत. पक्षपात, म्युनिसिपालिटी वगैरेमधून आपला फायदा करून घेणें, लांच खाणें, पैशाची अफरातफर याबद्दल ज्या कांहीं क्षुल्लक गोष्टी हिंदुस्थानांत कधींमधीं झालेल्या आहेत, तेवढ्यावरून हिंदुस्थान स्वराज्याला नालायक आहे असें म्हणणें अगदीं अविचाराचें आहे. ( हिंदुस्थानच्या लायकीबद्दल ) असा आरोप जेव्हां हिंदुस्थानचेच लोक करितात तेव्हां त्यांची ( नीतिमत्तेची ) कल्पना फार उच्च असते व त्यांना इतर देशांतील सार्वजनिक नीतिमत्तेची मुळींच माहिती नसते. पण पाश्चात्य लोक जेव्हां आरोप करतात तेव्हां त्यांचा त्यांत निवळ ढोंगीपणा किंवा पश्चिमेकडील पुष्कळ स्वतंत्र देशांतील वस्तुस्थितीचें गाढ अज्ञान दिसून येतें.

## स्थानिक स्वराज्य.

हिंदुस्थानांत स्थानिक संस्थांना जी कांहीं थोडीशी स्वतंत्रता दिली आहे तिच्या मानानें स्थानिक स्वराज्य जितकें यशस्वी व्हावयाला पाहिजे तितकें तें यशस्वी झालेलें आहे. पूर्वी जेव्हां सरकारी अधिकारी रस्ते, गटारें वगैरेंच्या सुस्थितीबद्दल एकटेच जबाबदार असत तेव्हांच्यापेक्षां आतां रस्ते,

गटारें वगैरे वाईट स्थितींत नाहींत. मुंबई सरकारनें कित्येक म्युनिसिपालिटींना आपलाच अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नुकताच दिला आहे. बंगाल सरकारनें तर जमाखर्चाचें अंदाजपत्रक तयार करण्यांत नुकतीच स्वतंत्रता दिली आहे. ती देतांना बंगाल सरकार म्हणतें कीं, "गव्हर्नर इन कौंसिल यांची हा प्रयोग यशस्वी ठरला, याबद्दल खात्री झाली आहे; तसेंच गव्हर्नर साहेबांच्या हेंहि लक्षांत आलें आहे कीं, म्युनिसिपालिटींच्या बाबतींत स्वतःच्या जबाबदारीची जाणीव व स्वतःच सर्व कारभार करण्याची पात्रता हीं वाढत आहेत. यामुळें जमाखर्चाच्या बाबतींतहि जर त्यांच्यावर जास्त भरंवसा ठेवला तर तो अनाठायीं होणार नाहीं असें मानण्यास गव्हर्नर साहेबांना उत्तेजन येत आहे." तेव्हां स्थानिक स्वराज्य अपयशी झालेलें नाहीं हें वरील गोष्टीवरून दिसून येतें.

## साक्षरता.

कधीं कधीं असें म्हणण्यांत येत असें कीं, हिंदुस्थानांत अशिक्षितपणा फार पसरलेला आहे म्हणून हिंदुस्थान स्वराज्याला योग्य नाहीं. अधिकारी वर्गांनीं हा कोटिक्रम उठवावा हें तर फारच आश्चर्य आहे; आज आहे त्यापेक्षां हिंदुस्थान जास्त सुशिक्षित करण्याची त्यांनींच तर काळजी घेतलेली नाहीं. शिक्षणाचा प्रसार गोगलगाईच्या चालीनें होत आहे. सन १८७३ सालांत जपानमध्यें, शाळेंत जाण्यालायक वयाच्या मुलांत संख्येच्या मानानें शेंकडा २८ मुलें शाळेंत जात असत; पण १९०२–०३ मध्यें तें प्रमाण शेंकडा ९० पर्यंत वाढलें. हिंदुस्थानांत हें प्रमाण शेंकडा १९$\frac{६}{१०}$ आहे. एखाद्या खात्यांत तूट आली कीं ती भरून काढण्यांत शिक्षणखात्याला धक्का बसावयाचा. मग त्यावेळेस इकडे सिव्हिलसर्वंटांचे पगार वाढले तर चालतील ! मि. गोखले यांचें प्राथमिक शिक्षणाचें बिल जें फेटाळलें गेलें तें या अधिकारीवर्गाच्या विरोधामुळेंच ! आमचीं मुलें शिकावयालाहि तयार आहेत व त्याबद्दल पैसाहि खर्च करावयाला तयार आहेत. पण त्यांना पुरतील इतक्या शाळा व इतकीं कालेजेंच नाहींत. शिक्षणखात्यानें ज्या ज्या गोष्टी आवश्यक म्हणून ठरविल्या आहेत त्यांच्यामुळें लोकांनाहि पुरेशा शाळा व पुरेशीं कालेजें काढणें शक्य नाहीं !

असें जरी आहे तरी, ५० वर्षांपूर्वी जपानमध्यें जेव्हां प्रातिनिधिक राज्य-पद्धतीची स्थापना झाली तेव्हां बहुतेक सामुराय लोकच कायते शिक्षित होतें. बाकीच्या लोकांत शिक्षणाचा प्रसार फारसा झाला नव्हता. हिंदुस्थानांत देखील वरच्या वर्गाचे लोक, आणि त्यांतहि विशेषतः पुरुषवर्ग सुशिक्षित आहेच. सार्वजनिक कामांत आज तेच पुढाकार घेत आहेत. तेव्हां, ज्या-प्रमाणें इतर सर्व देशांत सुरुवातीला प्रातिनिधिक संस्था वरच्या वर्गाच्या लोकांनींच चालविल्या आहेत त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या स्वराज्याकरतां, स्थानिक, प्रांतिक व साम्राज्यकौंसिलमधून लागणारी लोकांच्या प्रतिनिधींची संख्या सुशिक्षित मिळाली म्हणजे पुरे आहे. आणि ही संख्या मिळूं शकते ही गोष्ट महशूरच आहे.

प्रातिनिधिक संस्थांचा उपभोग इंग्लंड आज कित्येक शतकापासून घेत आहे. पण शिक्षणाचा विस्तृत प्रमाणावर प्रसार फक्त मागच्या शतकांतच झाला. किंग जॉनपासून जेव्हां बॅरन ( म्ह. सरदार ) लोकांनीं सुप्रसिद्ध सनद—मॅग्नाचार्टा—आपल्या सामर्थ्याच्या जोरावर मिळविली, त्या वेळेस बड्या लोकांपैकीं पुष्कळांना लेखणीपेक्षां भाल्याची टोकेंच जास्त सफाईनें पेलता येत असत. पुस्तकी ज्ञानाचा तर ते त्या वेळेस तिरस्कार करीत असत. त्यानंतरच्या पार्लमेंटरी पद्धतीच्या इतिहासांत देखील साक्षरता हें कांहीं इंग्लिश समाजाचें मुख्य स्वरूप नव्हतें. दुसऱ्या स्वतंत्र देशांमध्यें देखील स्वतंत्र संस्था व शिक्षणाचा प्रसार हें जोडीनें चाललेलं दिसून येत नाहीं. तथापि सुशिक्षितता हें जर स्वराज्याच्या पात्रतेला अत्यंत जरूर आहे असें वाटत असल तर तिची जी कांहीं मर्यादा ठरली असेल ती दहा वर्षांच्या काळांत गांठणें हें अधिकारी वर्गाच्याच हातीं आहे. एका शत-कापूर्वीच हिंदुस्थान व चीन हे जगतांतील सर्व देशांपेक्षां जास्त सुशिक्षित होते. तव्हां या अल्प काळांतच ज्यांनीं आमच्यापुढें आघाडी मारली आहे त्यांना गांठणें आम्हाला शक्य आहे.

पण आमच्या राज्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष आचरणावरून, ते शिक्षणाला इतकें महत्त्व देतातसें दिसत नाहीं. कारण साम्राज्य व प्रांतिक कौंसिलाची सर्व कामें

इंग्रजींत चालत असूनहि सरकारनें कित्येकदां इंग्रजीचा गंधहि नसणाराची कौंसिलांत नेमणूक केलेली आहे.

## " जर ब्रिटिश लोक एकदम निघून गेले तर "

हिंदुस्थानला स्वराज्य देणाऱ्या विरुद्ध असणारे लोक आणखी एक कारण सांगतात आणि ते त्यांना अगदीं बिनतोड वाटतें. ते म्हणतात कीं " हिंदुस्थानचें पुढें काय होईल याची पर्वा न करतां त्याला आहे असेंच सोडून जर ब्रिटिश लोक हिंदुस्थानांतून निघून गेलें, तर परचक्रापासून हिंदुस्थानच्या लोकांना आपलें संरक्षण करतां येणार नाहीं, आणि मग ते दुसऱ्या कोणत्या तरी प्रबल राष्ट्राच्या सत्तेला बळी पडेल. आणि हे नवे सत्ताधारी इंग्रजांपेक्षां खात्रीनेंच वाईट येणार. " यावर प्रथम आमचें म्हणणें असें आहे कीं सध्यां जें कांहीं हिंदुस्थान मागत आहे तें होमरूल—स्वराज्य—आहे, स्वातंत्र्य नाहीं. तेव्हां इंग्लिशांनीं निघून कां जावें ? हिंदुस्थानला स्वराज्य मिळालं म्हणजे मग एवढ्या मोठ्या पगाराचे इंग्रज अधिकारी येथें ठेवतां यावयाचे नाहींत ही गोष्ट खरी; आणि मग व्यापार व उद्योगधंदे यांच्या द्वारें आजच्याप्रमाणें हिंदुस्थानला लुटून नेण्याला सवडही सांपडणार नाहीं हीहि गोष्ट खरीच. स्वराज्याचा उपभोग घेणाऱ्या वसाहतीप्रमाणें येथेंही कांहीं इंग्लिश लोकांना जागा मिळतीलच, व त्यांना ब्रिटिश वसाहती किंवा रशिया, टर्की, चीन, पर्शिया, वगैरे स्वतंत्र राष्ट्राप्रमाणें हिंदुस्थानांतही भांडवल गुंतवून किंवा वरवर ठेवून पुष्कळ नफा मारण्याला येथेंही मुबलक सवड सांपडल. जेथें मध आहे तेथें मधमाशी असावयाचीच. जेथें लाभाची आशा असेल ती जागा सोडणें मनुष्यस्वभावाला धरून नाहीं.

कोणतीही ब्रिटिश वसाहत परचक्रापासून आपलें रक्षण स्वतःचे बळावर करूं शकत नाहीं. ब्रिटिश साम्राज्याची सत्ताच आज त्यांचें रक्षण करीत आहे, त्याच साम्राज्यानें हिंदुस्थानाला देखील तशीच मदत त्याच शर्तीवर कां करूं नये ? हिंदुस्थानचें रक्षण करण्याबद्दल त्याच्यापासून त्यांची किंमत म्हणून, पूर्ण सत्ता, माठमाठ्या नोकऱ्या, व लुटून नेण्याची संधी, या गोष्टी मोबदल्यांत कां मागाव्यांत ?

वसाहतवाले गोरे आहेत व आम्ही नाहीं, हें आम्ही जाणून आहोंत. आम्ही कांहीं इंग्रजांचे जातभाई नाहीं. तेव्हां कदाचित् पुष्कळ इंग्रज-लोकांच्या मनांत असें येत असेल कीं " सर्व आघात सोसावयाचे आम्ही, व सर्व सुखांचे धनी मात्र तुम्ही; काबाडकष्ट करावेत आम्ही, व तुम्ही मात्र चैनींत आणि संपत्तींत लोळावयाचें, असा जर व्यवहार असेल तर आम्हीं तुमच्या देशाचें रक्षण करण्याच्या भानगडींत कां पडावें ? " परंतु, आह्मांला पुष्कळ थोरथोर इंग्रजांनीं अनेक वेळ जें सांगितलें आहे कीं इंग्लंडची हिंदुस्थानांतील कामगिरी केवळ भूतदयाप्रेरित आहे, त्याप्रमाणें आम्हाला होमरूल—स्वराज्य—देऊन, आम्ही आपलें रक्षण स्वतः करण्याला समर्थ होई-पर्यंत केवळ परोपकार बुद्धीनें आमचें रक्षण करण्याकरितां इंग्रजलोक जर येथें रहातील तर ते त्यांना अत्यंत भूषणावह, आणि त्यांच्या मोठेपणाला साजेल असेंच होईल. तथापि हा व्यवहार अविचाराचा आहे असेंच जर त्यांना वाटत असेल तर इंग्लिशलोकांनीं यापुढें तरी हिंदुस्थानांतील इंग्लंडच्या कर्तव्याचा सर्व भार भूतदयेवरच टाकूं नये, अशी आम्ही त्यांना अत्यंत नम्रपणानें सूचना करतों.

आम्ही स्वसंरक्षणाला असमर्थ आहोंत, हा कांहीं सर्वथैव दोष नाहीं. सर. एस पी. सिंह, व मि. हक या दोघांनींही आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें सरकारनें आम्हाला सशक्त बनण्याला मदतच केली नाहीं. उलट अशक्त मात्र ठेविलें.

याही अडचणींतून पार पडण्याला एक मार्ग आहे. हिंदुस्थानच्या शिपा-यांनीं आपल्या शिपाईगिरीच्या गुणाबद्दल बिनतोड असे पुरावे दिलेले आहेत. ब्रिटिश अंमलापूर्वी व ब्रिटिश अमलाच्या सुरुवातीला, ब्रिटिशइंडियांतील प्रत्येक प्रांताच्या लोकांना लष्करांत जातां येत असें व ते जातही असत. तीच पद्धत पुनः सुरू करावी, आणि हिंदुस्थानच्या लोकांना लष्करांत शिपाई अधिकारी नेमून तोफखान्यासुद्धां लष्करांतील सर्व खात्यांचें शिक्षण द्यावें. हिंदुस्थानची आकाशयानें तयार करावींत, हिदुस्थानचें आरमार बांधावें, आणि या दाहाचींही व्यवस्था हिंदुस्थानच्या लोकांकडून करवावी. अशा-रीतीनें इंग्लंडला, स्वतःच्या रक्षणाला समर्थ असें हिंदुस्थान आतांही करत

येईल. आणि मग ' हिंदुस्थान आमच्या हातांत आलें तेव्हांपेक्षां आतां जास्त सशक्त आम्हीं केलें आहे ' अशी खऱ्या अभिमानाची प्रौढी इंग्लंडला मिरवितां येईल. पण सध्यां अशी स्थिति नाहीं; तर कदाचित याच्या उलट आहे. इंग्लंडनें जर वर सांगितल्याप्रमाणें आपलें कर्तव्य केलें तर त्यांत इंग्लंडचा देखील फायदाच आहे. कारण सांप्रतची युरोपांतील लढाई तर खास नाहींच; याच्या पुढची लढाई कदाचित् याच्यापेक्षांही भयंकर व प्राणनाशक होईल, व त्या वेळेस इंग्लंडला सशक्त अशा हिंदुस्थानची मदत लागेल. पण हिंदुस्थानला जर इंग्लंडनें सशक्त केलें नाहीं, तर इंग्लंडला पश्चात्ताप करावा लागेल. आमच्याविषयीं म्हणाल तर आम्हाला संकटाची संवयच झाली आहे, आणि आमच्या नशीबांत ज्या कांहीं भयंकर आपत्ति असतील त्या आम्हांला अगदीं निमुटपणें सहन केल्याच पाहिजेत. आमचा घात करणाऱ्या या दुर्बलतेतून मुक्त होऊन आमचें उच्च ध्येय आम्हाला प्राप्त होईपर्यंत पूर्वीं आम्ही भोगिल्या यापेक्षांही मोठमोठ्या आपत्तींतून आम्हाला जावें लागणार नाहीं, असें कोण सांगूं शकतील ? पण ' सुसंपन्न व सुखी ' इंग्लंडनें मात्र स्वतःबद्दल विचार करावा, आणि आपत्ति आल्या तर आमच्याप्रमाणेंच त्याला तोंड द्यावयाचें कीं काय हें ठरवावें. कारण सांप्रतच्या परिस्थितीच्या मानानें पाहतां, इंग्लंड व हिंदुस्थान या दोघांनाही परस्परांच्या साह्याची जरूरी आहे असें मानवी दृष्टीला दिसतें. आम्ही तर हें जाणतोंच; मग वैभवामुळें इंग्लंडची दृष्टि याबद्दल अंध बनली आहे की काय हें आम्हांला सांगतां येत नाहीं. कदाचित् इंग्लंडला असें वाटत असेल कीं आपल्या वांचून हिंदुस्थानचें अडणार आहे; पण हिंदुस्थानावांचून आपलें कांहीं अडत नाहीं. मानवी दृष्टीनें पाहिलें तर असें वाटणें साहजिकच आहे. वस्तुतः पाहतां कदाचित् असेंही असूं शकेल कीं दोघांचेंही परस्परा वांचून अडावयाचें नाहीं, आणि दोघांनाही स्नेहभावानें एकमेकांचा निरोप घेणें जास्त हितकरही होईल. पण भविष्यकालाच्या पोटांत काय काय साठविलेलें आहे हें आम्हांला कांहीं सांगतां येत नाहीं. कालावधीनेंच तें दिसून येईल.

## अंतस्थ उपद्रव.

आम्ही जर होमरूल—स्वराज्य—विषयीं हट्टच धरला आणि इंग्लिशांनींही कल्पना केल्याप्रमाणें आपली हिंदुस्थानांतून एकदम निघून जाण्याची धमकी खरी केली तर दुसरा एक भयंकर परिणाम होईल म्हणून आम्हांला भिवविण्यांत येतें, तो हा कीं, मग हिंदुस्थानांत जातींच्या, मतांच्या, व पंथांच्या परस्पर कलहाला कांहीं अंत रहाणार नाहीं. पण पुन्हा आम्ही असें विचारतों कीं इंग्लिशांनीं एकदम कां निघून जावें ? आणि विशेषतः आम्हांला सशक्त करून आमच्यांत एकी उत्पन्न करण्यापूर्वी त्यांनीं कां जावें ? तथापि असें जरी गृहीत घेतलें कीं इंग्रजांनींही हिंदुस्थानांतून निघून जाण्याचा हट्ट धरला व आपला धमकीचा शब्द खरा केला, तर त्याचा काय परिणाम होईल ? परचक्रासंबंधानें आम्हीं थोडक्यांत वर सांगितलेंच आहे. अंतः-कलहासंबंधानें जर पाहिलें तर—युरोपसुद्धां सर्व जगतांतील कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तर—या अंतःकलहांपासून कोणताहि देश कोणत्याहि काळीं सुटला आहे असें दिसून येत नाहीं. आपसांतील तंटे, बंडाळ्या व रक्तपात हे सर्व देशांत झालेले आहेत. पण कांहीं दिवसांनीं दोन पक्षांत समेट होऊन अथवा एक पक्षाची सरशी होऊन कशी तरी पुनः शांतता होत आलेली आहे. याप्रमाणें इतर देशांत जसें झालें तसेंच हिंदुस्थानांतही होईल. आम्ही कांहीं भांडकुदळे लोक मुलुखावेगळे नाहीं. आमच्यांत कधीं कधीं जातीचे, पंथाचे व वर्गाचे तंटे होतात, पण पाश्चात्य देशांत तर हे तंटे होऊन शिवाय आमच्यांत नसलेले असे मजूर व भांडवलवाले, सफ्रेजिट्स, निवडणुकी यांच्या बाबतींतही तंटे होतात. इंग्लिश लोकांनीं जर हिंदुस्थान सोडलेंच तर आम्ही आपसांत तंटे न करण्याचा शहाणपणा धरूं. आणि जर तंटे केलेच, तर त्यापासून होणारी अव्यवस्था चिरकाल टिकावयाची नाहीं. इतर देशांप्रमाणें पुनरपि शांतता व व्यवस्था त्याच रीतीनें परत येईल. ज्या वेळेस युरोपांतील राष्ट्रें हिंदुस्थानावर सत्ता मिळविण्याकरितां झगडत होतीं त्या वेळीं हिंदुस्थानांत अव्यवस्था व धुमश्चक्री चालू होती, आणि इंग्लिश लोकांनीं त्या अव्यवस्थेंतूनच हळू हळू व्यवस्था उत्पन्न केली. ही गोष्ट खरी आहे. पण अशा अव्यवस्थेचे प्रसंग प्रत्येक खंडाच्या व प्रत्येक देशाच्या

इतिहासांत आढळून येतात. हिंदुस्थानांतच फक्त हे प्रसंग आढळतात अ नाहीं. हिंदुस्थान जर विशेषतः अव्यवस्थेचें माहेरघरच असतें तर तें सुध रणेच्या व वैभवाच्या शिखराला कधींच पोंचलें नसतें. त्याची पूर्वी भरभराट हें एकच याला बिनतोड उत्तर आहे. त्या भरभराटीच्या काळ पासूनच पश्चिमेकडील सर्व राष्ट्रं हिंदुस्थानचा व्यापार आपल्या ताब्य घेण्याबद्दल खटपट करीत आहेत. त्या सुधारणेसंबंधानें सर टॉमस मन अगदीं अलीकडे म्हणजे मागच्या शतकाच्या सुरवातीला, असें लिहितात क इंग्लंड व हिंदुस्थान याच्यांत जर त्या वेळेपासून--हिंदुस्थानच्या सुधारणेच्य काळापासून--दळणवळण असतें तर इंग्लंडला उलट हिंदुस्थानापासू पुष्कळ फायदा झाला असता. अव्यवस्था चिरंतन--नेहमीं राहणारी--असल तर त्यांतून कोणत्याहि देशाची कधींही सुधारणा होत नाहीं. शिवाय जात पंथ, वर्ग यांच्यातलें तंटे ब्रिटिशसत्तेखालीं असलेल्या हिंदुस्थानांत जितव झाले आहेत तितके नेटिव्ह संस्थानांतून झालेले नाहींत. या एका गोष्ट वरूनच भाविष्यकाळच्या हिंदुस्थानांत शांतता राखण्याकरितां पोलीस य नात्यानें जरी ब्रिटिश लोक राहिले नाहींत तरी हिंदुस्थान कदाचित् या स तंट्यांपासून अलिप्तहि राहील, ही गोष्ट दिसून येते.

पण हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना निघून जाण्याला कारणच काय, हेंच आम्हाला खरोखर कळत नाहीं आणि ते निघून जातील असें आम्हाल वाटतहि नाहीं.

## समारोप.

इंग्लिशांविषयीं आमच्या मनांत स्नेहभाव नाहीं असें नाहीं, किंवा त्यांन आमचे किनारे सोडून जावे याविषयींहि आम्ही उत्सुक नाहीं. ज्यांतील मानवप्राणी सर्व बाजूंनीं आणि पूर्णपणें सुधारलेला आहे अशी एकहि जात नाहीं. राष्ट्रांचा परस्परांशीं संयोग, व त्यांचें परस्परांशीं दळणवळण ह सर्वांनाच हितकर असतें. आम्हांला जें पाहिजे तें हेंच कीं आमची सर्व बाजूनें वाढ होण्याकरितां संधि मिळावी व स्वातंत्र्यहि मिळावें. आमच वाढ खुंटली जावी, आम्ही दडपले जावें, व आमची लूट व्हावी, ह आम्हांला नको आहे. आमची प्रगति व्हावी, आमची किंमत आम्हांल

कळावी, आम्हांला स्पष्टपणें बोलतां यावें, व अशा रीतीनें जगताला जें कांहीं देण्याला आम्ही योग्य आहोंत तें आम्हांला देतां यावें. या आमच्या आकांक्षा न्यायाच्या आहेत, कायद्याला धरून आहेत, आणि सद्बुद्धिप्रेरित आहेत, हें आम्ही जाणून आहोंत, म्हणून परिणामाची भीति बाळगण्याचें आम्हांला मुळींच कारण नाहीं हें आम्ही जाणून आहोंत. तथापि ते जरी गेलेच तरी देखील आम्हांला आमच्या भवितव्यतेचा मार्ग दाखवीत आहेत ते हे इंग्लिशलोक नव्हेत, हे युरोपियन लोक नव्हेत, किंवा हे पाश्चात्त्य लोकहि नाहींत. सर्वापेक्षां प्रबल अशा शक्तीनेंच आम्हांला उत्पन्न केलें आहे. व तीच शक्ति आमचें भविष्यहि वर्तवून ठेवीत आहे. आमचें भविष्य प्रथमतः त्या शक्तीच्याच हातांत आहे, त्यांच्या खालोखाल आमच्या, व इतर जातभाईच्या हातांत आहे.

आम्ही स्वराज्याला पूर्णपणें पात्र नाहीं—पण कोणतेंहि राष्ट्र अशा रीतीनें पात्र नाहीं. आम्ही स्वराज्याला सर्वथा अपात्र नाहीं—पण कोणतेंहि राष्ट्र अशा रीतीनें सर्वथा अपात्र नाहीं. पात्रता ही अभ्यासानें व अनुभवानें वाढत असते. या शिवाय दुसरा मार्गच नाहीं व आम्ही त्याच मार्गानें आपली पात्रता वाढविण्याची इच्छा करीत आहोंत.

## स्वराज्यसंघ—पुस्तकमाला

# पुस्तक २ रें.

# इंग्लंडांतील स्वराज्याचा इतिहास.

[ लेखक-नरसिंह चिंतामण केळकर, चिटणीस स्वराज्यसंघ ]

हल्लीं स्वराज्याचा वाद कसून चालू झाल्यानें बहुतेक लोक स्वराज्याची मागणी करणें योग्य असल्याचें कबूल करूं लागले आहेत; पण त्यांतही कांहीं असे खप्पी आहेत कीं, स्वराज्याची मागणी करावी पण तिचा अंमल पुढें कालांतरानें व्हावा अशा अर्थाची करावी, असा तें श्लेष काढूं पाहतात. या लोकांना जेवण जावयाला तिखट हवेंच असलें तरी ते दुरून दिसलें म्हणजे पुरें तोंडांतच जाण्याचें कारण नाहीं. मारवाडी लोक जसे समोर टांगलेल्या मिरचीकडे दुरून पाहून जेवतात—तेवढें तिखट त्यांना पुरें होतें—त्याप्रमाणें भावी कधीं काळीं किंबहुना शतकांतरांनीं स्वराज्य मिळालें म्हणजे यांस बस्स झालें. असल्या मिळमिळीत आकांक्षा बाळगणारे हे लोक स्वतःस स्वराज्यवादी म्हणवून घेऊन त्यावर आपल्या मताला इंग्लंडच्या इतिहासांतला आधार घेऊं पाहतात. इंग्लंडचा इतिहास थोडाफार आम्हींही वाचला आहे. म्हणून हा इतिहास खरोखर काय सांगतो हें पाहण्याचें आज योजिले आहे.

इंग्लंडांतील लोकांचे एका अर्थी मूळापासून स्वराज्य आहे. नॉर्मन राजे व नॉर्मन लोक यांचा तेराव्या शतकांत इंग्रज लोकांना परकेपणा वाटत नाहींसा झाला. तेव्हांपासून त्यांचें स्वराज्यच आहे; कारण त्यांच्याच धर्माचा त्यांच्याच जातीचा व हितसंबंधानें त्यांनाच बद्ध झालेला असा त्यांचा राजा तेव्हांपासूनच आहे. पण मनोऱ्यावर जसें शिखर किंवा किल्ल्यांत जसा बालेकिल्ला म्हणून असतो, तसेंच या स्वराज्यांत आणखी एक उंच पदवीचें पोटस्वराज्य असतें

आणि हें पोटस्वराज्य हस्तगत करण्याला इंग्रज लोकांना इतकीं वर्षे व इतके श्रम लागले. इंग्लंडवर राजा कसला असावा असला प्रश्न उपस्थित झाला असतां, आपल्या जातीचा व आपल्याशीं सर्व प्रकारच्या हितसंबंधानें एकजीव झालेला असाच राजा आपल्यावर राज्य करितो—आपल्यांतलाच एक राज्यपदावर आहे, कोणी परका नाहीं—या विचारानें आपणास स्वराज्यसुख आहे, असें इंग्रज लोकांस बाराव्या शतकापासून ह्मणतां आलें असतें, पण नियामक व निर्णायक राज्यसत्ता राजाचे हातीं न राहतां लोकांच्या हातीं असावी, या अर्थाचें जें पोटस्वराज्य तेंच अत्यंत महत्त्वाचें असून तें मिळविण्यास इंग्रज लोकांचे आज सातशें वर्षांचे श्रम खर्ची पडले आहेत. हेंच खरें स्वराज्य, व तें हातीं आल्यावर राजा एक वेळ परका असला तरी त्याचें कांहीं वाटत नाहीं. नॉर्मन राजे हे जसें इंग्रजाना परके, तसेंच पहिल्या जॉर्ज राजापासूनचे हॅनोव्हेरियन राजे हेही इंग्रजांना परकेच, असें असतां राज्यसत्ता प्रजेच्या हातीं नसल्यानें नॉर्मन राजे त्यांना जितके परके वाटले, तितके ती सत्ता बहुतांशीं प्रजेचेच हातीं आल्यानंतर, हॅनोव्हेरियन राजे त्यांना परके वाटले नाहींत. हिंदुस्थानच्या लोकांचे व इंग्रज लोकांचे इतक्यापुरतें साम्य आहे कीं, हिंदी लोकांना इंग्रज बादशहा हे आतां परके वाटत नाहींसे झाले आहेत, तथापि राजसत्ता आहे याहून अधिक त्यांच्या हातीं येईल, तेव्हां हेच बादशहा आज वाटतात याहून अधिक स्वकीयसे वाटूं लागतील.

इंग्रज लोकांना लोकसत्ता हातीं येण्याला जर सातशें वर्षे लागलीं, तर आम्हांला त्यांच्याहून अधिक नसलीं तरी त्यांच्या इतकीं तरी लागलींच पाहिजेत असें मात्र ठरत नाहीं. इंग्लिश जनता स्वानुभवानें शहाणी झाली आहे. ज्या उदारमतवादी सुधारणा तिनें आपल्या राजकर्त्यांकडून मिळविल्या त्यांच्या अनुभवानें त्यांचा स्वतःचा स्वभावहि उदार बनविला असला पाहिजे. बापाला लाखोपति होण्याला लहानपणीं फार श्रम करावे लागले असले—हाडाचीं काडें करावीं लागलीं असलीं—म्हणून तो आपल्या मुलाला जवळची एक पैहि न देतां, त्यानेंहि आपल्यासारखें लाखोपति व्हावें याकरितां त्यालाहि लहानपणीं हाडाचीं काडेंच करण्यास लावील असें होणार नाहीं.

मुलानें आयत्या पिठावर रेघा ओढूं नये, आयदी बनूं नये, श्रमाची व पैशाची किंमत त्याला कळावी म्हणून तो त्याला निदान थोडासा तरी पैसा तूं अंगमेहनतीनें मिळीव असें म्हणेल; पण तो अंगमेहनतीच्या कसोटीस उतरतो असें पाहिल्यावर त्याला अधिक न शिणवितां आपल्या इस्टेटीचा त्याला धनी करील.

सर जमशेटजी बाटलीवाल्याला स्वतःला अंगमेहनत व काटकसर यांची किंमत कळत असली व ती आपल्या मुलाला कळावी अशी त्याची इच्छा असली, तरी तो त्याला आपल्यासारख्या केवळ बाटल्याच विकावयाला रस्त्यानें धाडील असें नाहीं. तर मुलाला बाजारांत व्यापार शिकावयाला धाडायचा झाला तरी तो त्यास घरच्या घोड्याच्या गाडींत बसवूनच पाठवील. आंब्यांचें झाड लावून पाणी घालण्याचे श्रम आद्यपूर्वजाला पडले असले, तरी पुढच्या पिढीला फक्त झाडावर चढण्याचें किंवा आढी घालण्याचे श्रम करून त्या झाडाचे आंबे खावयास मिळाल्यास त्यांत कांहीं फारसें वावगें नाहीं. अंतिम निर्णायक सत्तेचा प्रश्न एक वेळ असूं द्या; पण सुराज्यरूपी ज्या सुधारणा राज्यकारभारांत एकदां प्रस्थापित होऊन बसतात त्याचा फायदा उत्तरोत्तर पुढच्या पिढ्यांना आपोआप मिळतो; स्वकीयांना त्यांचा फायदा मिळतोच, पण अमित्र किंवा प्रतिपक्षीय मानलेल्या लोकांनाहि तो फायदा न मिळावा असें अधिकाऱ्यांच्या मनांत आलें तरी त्यांच्या तें हातीं रहात नाहीं. राजकारणांतच नव्हे तर भौतिक शास्त्रांतहि हाच नियम आढळून येतो. न्यूटन यानें गुरुत्वाकर्षणशक्तीचा नियम एकदां शोधून काढल्यावर तो पुनः शोधून काढण्याचे श्रम नव्या इंग्रजांसच नव्हेत तर इंग्लंडखेरीज इतर देशांतील लोकांस करावे लागले नाहींत. सारांश, बाब राजकीय असो वा शास्त्रीय असो; एकदां जी गोष्ट मोठ्या परिश्रमानें सिद्ध झाली तिजबद्दल दरवेळ तितके परिश्रम घ्यावे लागत नाहींत; व तसे न होईल तर मनुष्याची प्रगतिहि होणार नाहीं.

दुसरें असें; अनुभवानें शहाणपण येतें तें असे कीं, अमेरिकेंतील वसाहतवाल्यांवर सक्ति करून अमेरिका हातची घालविल्यावर कॅनडांतील वसाहतवाल्यांस स्वराज्य देण्यास इंग्लंड सावध राहिलें, तीच गोष्ट पुढे ट्रान्सवा-

ल्ची झाली. अमेरिकन वसाहतवाल्यांनीं इंग्लंडच्या पराभव करून स्वराज्य मिळविलें. पण कॅनडांत स्वराज्याकरितां झालेल्या बंडाचा मोड व ट्रान्सवालच्या बोअर लोकांनीं केलेल्या युद्धांत त्यांचा पराजय केला असतांहि कॅनडा व ट्रान्सवाल यांस इंग्लंदच्या इंग्रजांनीं अमेरिका मूळ युद्धांपूर्वी मागत होती त्याहून अधिक स्वराज्य दिलें. अर्थात् या दोनहि उदाहरणांनंतर ब्रिटिश साम्राज्याच्या कोणत्याहि अवशिष्ट भागांत स्वराज्य मागणारांना अमेरिकेइतका व ट्रान्सवाल इतका तर नाहींच, पण कॅनडाइतकाहि सायास पडूं न देतां योग्य समय पाहून इंग्लंड स्वराज्य देईल असें अनुमान कां करूं नये ?

या बाबतींत हिंदुस्थानाविरुद्ध अशी एक गोष्ट आहे, ती ही कीं, कॅनडा व दक्षिणआफ्रिका येथील वसाहतींत अनुक्रमें फ्रेंच व बोअर लोक असले तरी ते गोरे, युरोपियन, स्वधर्मी व स्ववर्मी होते आणि बाकी राहिलेले इंग्रज म्हणजे अर्थात् सर्वस्वी आत्मीय लोक होते म्हणून त्यांना स्वराज्य देण्यास इंग्रजांना विशेष कांहीं वाटलें नाहीं; पण हिंदी लोकांना इंग्रज जसे सर्वस्वी परकी तसे इंग्रजांना हिंदी लोक सर्वस्वी परकी नव्हेत काय ? ते तसे असल्यामुळें कांहीं झालें तरी हिंदी लोकांना स्वराज्य देण्याची प्रवृत्ति इंग्रजांना होणारच नाहीं. पण यावर दोन उत्तरें आहेत. एक असें कीं, वर सांगितलेल्या उदारमतवादी स्वभाव बनण्याच्या व शहाणपण येण्याच्या गोष्टी सोडून दिल्या तरी पूर्वीच्या काळापेक्षां हल्लीं स्वतः इंग्लंडच्या स्थितींत बराच फरक पडलेला आहे व यापुढें आणखीहि पडेलसें दिसत आहे. साम्राज्याच्या सर्व भागांत संतोष राखण्याची गरज पूर्वीपेक्षांहि आज अधिक आहे हें प्रस्तुतच्या युद्धावरून इंग्लंडला कळून चुकलें आहे. हातचा अधिकार देऊन टाकण्याच्या बाबतींत राज्यकर्त्यांच्या आत्मस्थ भावनेंत फरक पडणें ही मुख्य गोष्ट आहे; तो फरक घडून आल्यावर परकीयांनाहि ते अधिकार देण्याची बुद्धि सहज होते व तो जोंपर्यंत घडून आलेला नाहीं तोंपर्यंत स्वकीयांनाहि ते अधिकार देण्याची बुद्धि होत नाहीं, हें खुद्द इंग्लंडांतल्या इंग्रज लोकांची कित्येक शतकांपूर्वीची व आजची हिंदी लोकांची स्थिति यांची तुलना केली असतां कोणासहि दिसून येणार आहे. आज ज्या स्वरूपाचीं कायदेकौंसिलें हिंदुस्थानांत आहेत त्या स्वरूपाचें पार्लमेंट इंग्रजांना स्वदेशांत स्वकीय राजांकडून मिळविण्यास

पडलेल्या श्रमाहून फारच अधिक श्रम पडलेले आहेत, याला इंग्रजी इतिहासच साक्ष देत आहे. आज हिंदी कायदे-कौंसिलांत हिंदी लोकांचें बहुमत नाहीं हें खरें. पण प्रजेचें व्यक्तिस्वातंत्र्य, त्यांना न्याय मिळण्याचीं साधनें, प्रजेकडून कर वसूल करण्यास असणारीं बंधनें जा आहेत तीं खुद्द इंग्रजांना दुसऱ्या जेम्स राजाच्या कारकीर्दीनंतरच मिळालीं. पण हे असले अधिकार मिळविण्याकरितां म्हणून कांहीं एक न करितां हिंदुस्थानास त्या राजकीय सुधारणा व ते हक्क पन्नास वर्षांच्या अमदानींत मिळाले हें लक्षांत आणिलें, तर प्रत्येक संस्थेंत अमुक एका प्रकारची राजकीय परिणति होण्यास अमुक इतकाच काळ लागतो, किंवा ती अमुक एका प्रकारच्याच व अमुक एका गतीच्या पद्धतीनें होते असें म्हणतां येणार नाहीं. जगांत कांहीं गोष्टी ठराविक अनुक्रमानेंच पदरीं पडणाऱ्या असतात. पण इतर कांहीं गोष्टींना, पूर्वसंचिताचा फायदा मिळून त्यांचा क्रम सर्वस्वी न बदलला तरी तो क्रम आक्रमण्याला फार थोडा काळ पुरतो. उदाहरणार्थ, व्यक्तिमात्राला बाळपण तरुणपण व वार्धक्य हीं यथाक्रमानें व यथाकालानेंच प्राप्त होणारीं आहेत. पण शरीराच्या परिणतीचा हा नियम मानसिक गुणांना लागतोच असें नाहीं. ज्याला पूर्वपरंपरेचा किंवा पूर्व संचिताचा फायदा मिळालेला नाहीं अशा नीग्रोचा मुलगा बुद्धीनें किंवा संस्कृतीनें जितका परिणत असतो, त्यापेक्षां ज्याला पूर्वपरंपरेचा व पूर्वसंस्कृतचिा फायदा भरपूर मिळालेला आहे असा हिन्दी किंवा युरोपियन मुलगा बुद्धीनें व संस्कृतीनें पुष्कळच अधिक परिणत असल्याचें आपण प्रत्यक्ष पाहतों. मनुष्यगर्भ अवघ्या नऊ महिन्यांत तत्पूर्वीच्या हजारों जीवयोनींच्या स्वरूपांतून जातो असें म्हणतात. या जीवयोनि उत्क्रांत होण्याला हजारों-किंबहुना लाखों वर्षे-लागलीं; पण त्यांच्या परिणतीचा फायदा मनुष्ययोनीपर्यंत येऊन पोंचलेल्या प्राण्यास अवघ्या नऊ महिन्यांच्या कालावधींत मिळतो. राजकीय संस्थेंत उत्तरोत्तरच्या पिढीच्या प्रजेस राजकीय परिणतचिा अनुभव मिळावयाचा तो बालपण, तारुण्य व वार्धक्य अशा वैयक्तिक स्वरूपाचा नसून उत्क्रांतिचक्रांत शेवटीं येणाऱ्या जीवयोनींच्या अनुभवाप्रमाणें समवायिक स्वरूपाचा असतो. अर्थात राजकीय सुधारणांचा प्रत्यक्ष अनुभव व शिक्षण मिळण्यास परिणत राजकीय संस्था

आल्या तरी बालपण, तारुण्य याप्रमाणें यथाक्रम थोडासा काळ घालवावा लागेल हें खरें; तरी पण त्या संस्था पदरीं पडण्यास पूर्वकालीनांना जितका वेळ लागेल तितकाच उत्तरकालीनांना लागला पाहिजे असें मात्र नाहीं.

आतां जी काय गोम म्हणून आहे ती त्या संस्थांचा प्रत्यक्ष फायदा हातीं पडण्यामध्यें. हा फायदा पदरांत पाडून घ्यायला मात्र पूर्वकाळीं काय व अद्यु काय प्रजाजनांपैकीं व्यक्तिमात्रांनीं स्वार्थत्यागपूर्वक करारीपणानें परिश्रम करण्यास तयार असलें पाहिजे; नाहींतर राजकीय संस्था मिळूनहि त्या न मिळाल्याप्रमाणेंच निष्फळ होण्याचा संभव असतो. आपण इंग्लंडचेंच उदाहरण घेऊं. विलियम धी कॉंकरर या नॉर्मन राजानें सन १०६६ त इंग्लंड जिंकलें. तो परकीय होता, तथापि त्यानें आपल्या कारकीर्दींत जुन्या इंग्लिश संस्था शाबूत ठेवल्या व शिवाय प्रजासंरक्षक व प्रजास्वातंत्र्याचे नवे कायदे केले. या कायद्यांत म्हटलें तर बीजरूपानें इंग्रजांचें राष्ट्रीय स्वातंत्र्य संगृहीत झालेलें आहे. ( The Laws of the Confessor in which the whole of the National liberties were summed up. Green P. 121. ) पण त्या कायद्यांचा काय उपयोग झाला ? याच विलियमचा मुलगा दुसरा विलियम यानेंच ते कायदे गुंडाळण्याचा प्रयत्न केला. पण त्याला ॲन्सेल्मसारखा दांडगा प्रतिस्पर्धी प्रजाजन लगाम घालण्यास मिळाला म्हणून निभाव लागला. धर्मसंस्थांना राजापासून तात्पुरतें स्वातंत्र्य मिळालें, आणि या एका माणसाच्या उदाहरणानें एकंदर प्रजाजनांमध्यें स्वातंत्र्यबुद्धि निर्माण केली. ह्या दांडगाईचा उपयोग पुढच्या म्हणजे पहिल्या हेनरीच्या कारकीर्दींत प्रजेस नवीन सनद मिळण्यांत झाला. प्रसिद्ध मॅग्नाचार्टाचा ही सनद पायाच होय.

या पायावर इंग्रजी कॉन्स्टिट्यूशनची म्हणजे प्रजेच्या हक्काची इमारत पुढें कशी उभारण्यांत आली, त्याकरितां वेळोवेळीं लोकांच्या पुढाऱ्यांस काय परिश्रम करावे लागले, अगर निग्रहानें किती स्वार्थत्याग करावा लागला वगैरे गोष्टी इंग्लंडच्या इतिहासांत नमूद आहेत, त्या सर्व येथें सांगत बसण्याचें कारण नाहीं. आम्हांला त्यापासून जो बोध घ्यावयाचा तेवढाच येथें सांगतों म्हणजे झालें. पैकीं, हिंदी प्रजेला असे हक्क मिळण्यास तितका

काळ लागण्याची अवश्यकता नाहीं हें वर दाखविलेंच आहे; पण तितक्या कालाची जरी जरूरी नसली तरी लोकांच्या तशा पुढाऱ्यांची जरूरी नाहीं असें मात्र त्यावरून सिद्ध होत नाहीं. १८५८ चा जाहिरनामा एका दृष्टीनें पाहिलें असतां आमचा मॅग्नाचार्टाच आहे असें म्हणतात; कांग्रेसच्या पुढाऱ्यांनीं आजपर्यंत तसें पुष्कळ वेळा म्हटलें आहे; पण या जाहिरनाम्याचा पुरा अम्मल होण्यास आमच्याकडील पुढाऱ्यांनीं जशी अविश्रांत खटपट करावयास पाहिजे तशी अद्यापि केली नाहीं. ही उणीव दूर होऊन स्वराज्याच्या म्हणजे होमरूलच्या प्रास्त्यर्थ शक्य तेवढ्या जोराची व निग्रहाची मागणी करावी याकरितांच स्वराज्यसंघ निघणें जरूर आहे. मग तें स्वराज्य आज मिळो वा पांच—पन्नास वर्षांनीं मिळो. निग्रहानें उद्योग करण्यास लागणें ही गोष्ट स्वतंत्र असून तिचा फलप्राप्तीच्या कालाशीं निष्कारण संबंध जोडून आपल्या उद्योगपराङ्मुखतेचें समर्थन करणें अगदीं गैरशिस्त होय. होमरूल लीग उद्योगाकरितां आहे आणि हा उद्योग जर सतत निग्रहानें चालू राहील, तर त्याचें फल आम्हांस मिळाल्याखेरीज रहावयाचें नाहीं अशी आमची मनोदेवताच काय पण इंग्लंडचा इतिहासहि साक्ष देत आहे. ज्या वेळीं आपणास ज्याची जरूरी वाटते त्या वेळीं त्यासाठीं लोकांच्या पुढाऱ्यांनीं उद्योग करणें हें इंग्लंडच्या इतिहासाचें खरें तत्व आहे. तेंच प्रस्तुत प्रसंगींहि लागू केलें पाहिजे. (केसरी.)

REFBK-0019150

१२५५०

# धी होम-रूल लीग.

## ( मान्यता )

मी खालीं सही करणार ——————————————

——————————————————————

ह्या लेखानें असें कळवितों कीं मीं ' होम-रुल लीग ' चे उद्देश वाचले आहेत व ते मला मान्य आहेत. संघाचा ( लीगचा ) सभासद होण्याची माझी इच्छा आहे व मी या लेखाबरोब दोन रुपये प्रवेश फी व रु. ———— वार्षिक वर्गणी म्हणून देत आहें

सही ——————————————

पूर्ण नांव ——————————————

हुद्दा ——————————————

धंदा ——————————————

) संघाचे उद्देशाप्रमाणें काम पुढें चालविण्याकरितां खालील गृह-कमिटी नेमण्यांत आली आहे:--

) डॉ. वि. रा. पटवर्धन बी. ए. एल् एल् बी. ( पुणें. )
) रा. रा. ग. श्री. खापर्डे बी. ए. एल् एल् बी. (अमरावती )
रा. रा. बा. गं. टिळक बी. ए. एल् एल् बी. ( पुणें. )
बॅरिस्टर जोसेफ बॅपटिस्टा बी. ए. एल्. एल् बी आर अॅटला एल्. सी. ई. ( मुंबई )
रा. ब. चिं. वि. वैद्य एम्. ए. एल् एल् बी. ( कल्याण. )
रा. रा. र. पां. करंदीकर हायकोर्ट वकील ( सातारा. )
ना. द. त्र्यं. बेळवी बी. ए. एल् एल्. बी. ( बेळगांव. )
डॉ. बा. शी. मुंजे एल. एम्. अॅन्ड एस. ( नागपूर. )
रा. मा. श्री. आणे बी. ए. एल् एल्. बी. ( यवतमाळ. )
) रा. रा. एस्. के आळतेकर बी. ए. एल् एल्. बी. ( कराड )
रा. रा. ब. ग. फणसळकर हायकोर्ट वकील ( सातारा. )
) डॉ. चं. म. देसाई एल्. डी. एस् ( मुंबई. )
) डॉ. दि. धों. साठे एफ. आर. सी. एस्.
) डॉ. रा. गो. वझे एल्. एम्. अॅन्ड एस्. ( नें. ) ( पुणें )
) रा. रा. ना. रं. आळेकर बी. ए. एल् एल् बी. (नागपूर )
) रा. रा. वि. रा. लेले ( सोलापूर. )
) रा. रा. न. चिं. केळकर बी. ए. एल् एल् बी. ( पुणें. )